विवेकवादी, विज्ञानवादी, समाजवादी

# विवेकानंद

– डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर



# विवेकवादी, विज्ञानवादी, समाजवादी विवेकानंद

---


- **लेखक:**

  दत्तप्रसाद दाभोळकर

- **प्रकाशक व मुद्रक:**

  अलका जोशी, लोकायत, १२९ बी/२, सिंडिकेट बँकेसमोर,
  लॉ कॉलेज रोड, नळस्टॉप जवळ, पुणे – ४११ ००४
  संपर्क: ९४२२३१९१२९

  जी.जी. परीख, जनता साप्ताहिक, डी/१५, गणेश प्रसाद,
  नौशीर भरुचा मार्ग, ग्रांट रोड (पश्चिम), मुंबई – ४०० ००७
  संपर्क: ०२२-२३८७००९७

- **मुद्रणस्थळ:**

  आर. एस. प्रिंटर्स, ४५५, शनिवार पेठ, पुणे – ४११ ०३०

- **पहिली आवृत्ती:** जून २०१५
  **दुसरी आवृत्ती:** फेब्रुवारी २०१८



- **कॉपीराइट नाही**



लोकायत

सोशलिस्ट पार्टी (इंडिया)

जनता साप्ताहिक, मुंबई

**सहयोग मूल्य: ₹ ५/-**

# प्रस्तावना

'समाजवादी विवेकानंद' हे शीर्षक वाचून तुम्ही आश्चर्यचकित झाला असाल. हिंदू कट्टरपंथीयांनी विवेकानंदांचे खरे विचार लोकांपर्यंत कधी पोहोचू दिले नाहीत, म्हणूनच त्यांची प्रतिमा एक हिंदुत्ववादी संन्यासी म्हणून लोकप्रिय झाली. स्वामी विवेकानंदांसारख्या महापुरुषांना आपल्या विचारांनुसार प्रस्तुत करून आपले कट्टर विचार समाजामध्ये पसरवण्याचा हिंदुत्ववाद्यांचा खूप जुना मार्ग आहे. त्यांनी सुरुवातीला शिवाजी महाराजांबाबत हेच केले आणि आज ते डॉ. आंबेडकरांबाबतही तेच करण्याचा प्रयत्न करत आहेत.

ही पुस्तिका डॉ. दत्तप्रसाद दाभोळकरांच्या विवेकानंदांसंबंधीच्या लिखाणावर आधारित आहे, ज्यात त्यांनी विवेकानंदांचे खरे विचार जनतेसमोर आणले आहेत. डॉ. दाभोळकरांनी सविस्तर संशोधनानंतर *शोध स्वामी विवेकानंदांचा*[1] हे पुस्तक लिहिले आणि त्यानंतर मराठीतील अनेक प्रमुख मासिकांमधून अनेक लेखही लिहिले आहेत. डॉ. दाभोळकरांनी आपल्या लिखाणात विवेकानंदांच्या विचारांचे अतिशय तपशीलात वर्णन केले आहे. त्यांच्या लिखाणात विवेकानंदांचे स्त्रीमुक्ती, जातीव्यवस्था, धर्म, विवेकवाद, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि समाजवाद ह्याबाबतचे विचार सोप्या आणि साध्या पद्धतीने उघड होतात. विवेकानंदांचा समतेकडे आणि समाजवादी समाजरचनेकडे असलेला ओढा डॉ. दाभोळकरांच्या संशोधनातून स्पष्टपणे पुढे येतो.

केंद्रात भाजपचे सरकार आल्यापासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा (आरएसएस) हिंदुत्ववादाचा आग्रह खूपच वेगाने वाढला आहे. संविधानात समाविष्ट असलेल्या लोकशाही, धर्मनिरपेक्ष आणि समाजवादी भारताच्या विचारांची पायमल्ली करून *मनुस्मृती* व चातुर्वर्ण्यावर आधारित समाजरचना आणण्यासाठी चहू बाजूंनी हल्ला करत आहेत. 'घरवापसी' व 'लवजिहाद' सारख्या मोहीमांच्या माध्यमातून अल्पसंख्यांकांना धमकावणे, विनाकारण त्यांच्या धार्मिक स्थळांवर हल्ले करणे आणि गोमांस भक्षणाच्या नावावर त्यांना मारहाण व हत्या करणे, हे सर्व ह्याच धोरणाचा एक भाग आहे. शिक्षणाच्या भगवीकरणाच्या उद्देशाने शिक्षणक्षेत्रातील अनेक क्रमिक पुस्तकांमधील बदल, अनेक पुस्तकांवर बंदी, वैज्ञानिक विचारांपेक्षा पौराणिकतेला महत्त्व देणे, इतिहासकारांवर हल्ले, महत्त्वाच्या संशोधन, शैक्षणिक व सांस्कृतिक संस्थांमध्ये हिंदूत्ववाद्यांची भरती, अशा अनेक प्रकारांनी आता खुलेआम, प्रसंगी शासकीय यंत्रणेचा वापर करून समाजात सांप्रदायिकता वाढवत आहेत. धर्मनिरपेक्षतेची पायमल्ली करून स्वतंत्र भारताच्या इतिहासात पहिल्यांदा आरएसएस च्या दसरा मेळाव्याचे आणि सरसंघचालक मोहन भागवतांचे भाषण दूरदर्शनवर थेट प्रसारित केले गेले.

त्यापेक्षा गंभीर गोष्ट ही की देशामध्ये दहशतवादी वातावरण निर्माण होत आहे. हे काम ह्याच फॅसिस्ट विचारांनी निर्माण केलेल्या द्वेष व असहिष्णुतेच्या संस्कृतीतून जन्माला आलेले गुंड करत आहेत. गेल्या तीन वर्षात चार विचारवंतांच्या दिवसाढवळया हत्या केल्या गेल्या:

विविध धर्मातील अंधश्रद्धांच्या विरुद्ध अहिंसक मार्गाने लढणारे डॉ. नरेंद्र दाभोलकर, 'शिवाजी हा मुस्लिम विरोधक राजा आहे' अशा हिंदुत्ववादी प्रचाराला उघडे पाडून शिवाजी महाराज कसे धर्मनिरपेक्ष होते, सर्व जाती-धर्माच्या लोकांचे लाडके राजे होते ही त्यांची खरी ओळख करून देणारे पुस्तक लिहिणारे कॉ. गोविंद पानसरे, प्रसिद्ध विवेकवादी विचारवंत व कर्नाटकातील हंपी कन्नड विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. एम.एम. कलबुर्गी आणि कट्टरपंथी हिंदुत्ववाद्यांच्या विरोधात निर्भिडपणे लिहिणारी पत्रकार गौरी लंकेश. ह्या चारही हत्यांमध्ये काहीच नवीन नाही. सॉक्रेटीस, चार्वाक, तुकाराम ते महात्मा गांधी ही सर्व विवेकवादाच्या लढाईतील बलिदाने आहेत.

देशापुढे फॅसिझमचे गंभीर संकट येऊन ठेपले आहे. अशा वेळी विवेकानंदांचे खरे विचार लोकांपर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे. विवेकानंद हे पारंपरिक हिंदू संत नव्हते तर ते आधुनिक तपस्वी होते. *जातीअंत हे आपले ध्येय असले पाहिजे; धर्मग्रंथांपेक्षा बुद्धीप्रामाण्य मान्य केले पाहिजे; व्यक्तिस्वातंत्र्य व स्त्रीमुक्तीशिवाय विकास शक्य नाही; दलितांसाठी आरक्षण असले पाहिजे*—अशी प्रखर मते मांडणारे विवेकवादी आणि विज्ञानवादी विवेकानंद जनतेसमोर आणणे आवश्यक आहे. ते हिंदू संत असूनही धर्मनिरपेक्ष होते. त्यांनी असे म्हटले आहे की *आपली मातृभूमी हिंदू धर्म आणि इस्लाम ह्या दोन महान परंपरांची मिलाप झालेली भूमी आहे. वेदांना मेंदू आणि इस्लामला ह्या देशाचे शरीर बनवा. अशा परिपूर्ण भारताचे स्वप्न मी अंतर्मनात पाहत आहे.*[2] पुढे ते म्हणतात, *गोशाला वाचवण्याऐवजी माणसे कशी जगत आहेत ते पाहावे.* दुसऱ्या संतांप्रमाणे त्यांनी कधी आपल्या मोक्ष किंवा मुक्तीसाठी ईश्वराची प्रार्थना केली नाही, उलट वर्षानुवर्षे शोषित राहिलेल्या गरीब आणि दुर्बल लोकांच्या मुक्तीची प्रार्थना ते ईश्वराजवळ करायचे, मग ते हिंदू असोत वा मुसलमान वा ख्रिश्चन कुणी का असेना. त्यांनी आपले आयुष्य अशा लोकांसाठीच समर्पित केले होते. ते म्हणाले होते की '*माझी अशी इच्छा आहे की मी परत परत जन्म घ्यावा आणि अनेक दुःख भोगत राहावी जेणेकरून मी त्या एकमेव ईश्वराची सेवा करू शकेन जो सर्व प्रजाती आणि वर्णाच्या गरिबांमध्ये व दुःखितांमध्ये वसलेला आहे.*'[3] ब्राह्मण पंडितांनी ज्या पद्धतीने लोकांचे शोषण केले आहे त्यावर भाष्य करताना ते म्हणतात, '*गरिबांवर आणि खालच्या जातीच्या लोकांवर क्रूर अन्याय करणारा हिंदू धर्मासारखा ह्या पृथ्वीतलावर कोणताही धर्म नाही.*'[4] त्यांनी असं म्हटलंय की, *ह्या देशातील ख्रिश्चन आणि मुसलमान धर्मांतरे दबावामुळे नव्हे तर उच्चवर्णीयांनी केलेल्या अत्याचारांमुळे झाली आहेत.* १८९६ मध्ये ते म्हणाले आहेत की *मी समाजवादी आहे.*

फॅसिझमच्या सांस्कृतिक आक्रमणाचा सामना करण्यासाठी विवेकानंदांच्या खऱ्या विचारांना सर्वसामान्य जनतेसमोर आणणे आवश्यक आहे. एक विवेकवादी, विज्ञानवादी आणि समाजवादी संत ही त्यांची प्रतिमा लोकांसमोर आणणेही गरजेचे आहे. ह्याच उद्देशाने ही पुस्तिका प्रकाशित करत आहोत.

# विवेकवादी, विज्ञानवादी, समाजवादी विवेकानंद

२० ऑगस्ट १८९३ ची गोष्ट आहे. विवेकानंद केट सनबोर्न ह्यांच्या फार्महाऊसवर राहत होते. केट सनबोर्न एक प्रसिद्ध लेखिका होत्या आणि मेसाचुसेट्सच्या स्मिथ कॉलेजमध्ये इंग्रजी साहित्याच्या भूतपूर्व शिक्षिका होत्या. त्यावेळी लोक विवेकानंदांची खिल्ली उडवत होते कारण ते विश्व धर्म परिषदेला आमंत्रण नसताना पोहोचले होते. पण विवेकानंदांना त्याची काहीच चिंता नव्हती. उलट आमंत्रण मिळवण्याचा काही ना काही मार्ग शोधून काढू हा आत्मविश्वास त्यांना होता. त्यादिवशी त्यांच्या मनावर कुठलाही धार्मिक विचार नव्हता. आपल्या शिष्यांना ते वेगळ्याच विषयावर पत्र लिहितात, भारतातील गरीब आणि पतितांच्या स्थितीबद्दल ते लिहितात, 'त्यांच्याजवळ ना संधी आहे, ना जिवंत राहण्याचा आणि उत्कर्षाचा मार्ग. अनेक शतकांपासूनच्या अत्याचाराच्या वेदना, दुःख, अधःपतन आणि दारिद्र्याचे उसासे भारतभरात घुमतायत.' ते पुढे म्हणतात की त्यांना 'ह्या परिस्थितीतून बाहेर पडण्याचा उपाय', 'भारतात शतकानुशतके असलेल्या दुःखाच्या डोंगरांना आग लावण्याचा मार्ग' सापडला आहे. जरी 'ते काही एक दिवसाचे काम नाही आणि हा रस्ता काट्याकुट्यांनी भरलेला आहे . . . पण आपल्याला यश नक्की मिळेल.'[5]

विवेकानंद एवढ्या ठामपणे हे विधान करताहेत ह्याच्या मागे कारण होते. १८९० मध्ये वयाच्या सत्ताविसाव्या वर्षी त्यांनी वराहनगर मठ सोडला आणि ते भटका संन्यासी बनले. ३१ मे १८९३ ला ते कलकत्त्याहून अमेरिकेस जाण्यासाठी बोटीवर चढले तेव्हा त्यांनी तीन वर्षात भारत उभा आडवा पिंजून काढला होता. ह्या यात्रेमध्ये त्यांनी जे पाहिले त्याने ते खूप अस्वस्थ झाले. आपल्या मित्रांना व शिष्यांना लिहिलेल्या पत्रात त्यांनी देशातील वंचितांच्या आणि गरिबांच्या परिस्थितीमुळे होणाऱ्या यातना मांडल्या आहेत. ह्या पत्रांमधून गरिबांना दुःख आणि दारिद्र्यातून बाहेर काढण्याची त्यांची उत्कट इच्छा स्पष्ट दिसते. खूप चिंतन केल्यानंतर काही पत्रांमधून ते लिहितात की त्यांनी गरीबी, अज्ञान, परंपरा आणि अंधश्रद्धांमध्ये जखडलेल्या वीस कोटी हिंदू, मुसलमान आणि ख्रिश्चन पुरुष, महिला आणि मुलांच्या मुक्तीचा मार्ग शोधून काढला आहे. आणि हा मार्ग तीन सिद्धांतांवर आधारित आहे—तर्कशक्ती, विज्ञान आणि समता.

## विवेकवादी विवेकानंद

*कोणत्याही गोष्टीवर आंधळेपणाने विश्वास ठेवू नका.*

विवेकानंद एक असामान्य वैज्ञानिक संत होते. ते स्पष्टपणे म्हणतात,

> चमत्कारावर आमचा मुळीच विश्वास नाही. . . . भारतात ज्या अनेक आश्चर्यकारक गोष्टी केल्या जातात आणि विदेशी मासिकांमधून ज्यांचे वर्णन केले जाते, ते हातचलाखी किंवा संमोहनशास्त्राचे भ्रम आहेत, ते शहाण्या लोकांचे काम नाही.[6]

८ मार्च १८९५ ला दिलेल्या एका व्याख्यानात त्यांनी म्हटले आहे की,

> चमत्कारांना मी सत्याच्या मार्गातील सगळयात मोठा अडथळा मानतो.[7]

३० नोव्हेंबर १८९४ ला किडी (सिंगारावेलू मुदलियार) ह्यांना लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात:

> चमत्कार . . . काहीही सिद्ध करत नाहीत. भौतिक वस्तूंवरून चैतन्याचा पुरावा देता येत नाही. ईश्वर, आत्म्याचे अस्तित्व किंवा अमरत्व ह्याच्याशी चमत्कारांचा काय संबंध असू शकतो? . . . तुम्ही अशा प्रकारच्या अद्भूत गोष्टींवर लक्ष देऊ नका, आणि आपल्या मतांधतेमुळे दुसऱ्याला त्रास देऊ नका.[8]

ह्याचप्रमाणे ते ज्योतिषशास्त्रालाही नाकारतात:

> ज्योतिष आणि ह्या सर्व गूढ गोष्टी कमजोर मनाच्या प्रतीक आहेत; म्हणून जेव्हा आपल्या मनात ह्या गोष्टी उफाळून येतात तेव्हा आपल्याला एखाद्या डॉक्टरकडे जायला पाहिजे, चांगले भोजन केले पाहिजे आणि आराम केला पाहिजे.[9]

गौतम बुद्धांच्या बोलण्याचा संदर्भ देऊन विवेकानंद तर हेही म्हणतात की जे लोक असल्या फालतू गोष्टींचा प्रचार करतात ते प्रत्यक्षात लबाड असतात:

> जे लोक ग्रह, तारे, नक्षत्र ह्या गोष्टींचा खोटा बहाणा करून आपला पोटापाण्याचा व्यवसाय करतात, त्यांच्यापासून दूरच राहायला हवे.[10]

ही गोष्ट ते एका कहाणीतून समजावून सांगतात:

> एका ज्योतिषाबद्दल एक जुनी कथा आहे. एका राजाकडे जाऊन तो म्हणाला, 'सहा महिन्यांत तुझा मृत्यू होणार आहे.' हे ऐकून राजा इतका घाबरला की त्याची अवस्था मरणासन्न झाली. पण त्याचा प्रधान शहाणा होता. तो राजाला म्हणाला की हे ज्योतिषी मूर्ख असतात. पण राजा त्याचे म्हणणे ऐकायला तयार नव्हता. राजासमोर ज्योतिषाला मूर्ख सिद्ध करण्याशिवाय प्रधानाकडे काही दुसरा पर्याय नव्हता. ज्योतिषाला राजदरबारात बोलावले गेले आणि त्याला विचारले गेले की त्याचे गणित पक्के आहे ना? ज्योतिषाने उत्तर दिले की त्याच्या गणितात चूक

> तुम्ही सर्व अंधश्रद्धाळू होण्याऐवजी कडवे नास्तिक जरी झालात तर मला जास्त आनंद होईल, कारण नास्तिक जिवंत आहेत, आणि त्यांच्याबद्दल तुम्ही काही करू शकता. पण जर अंधश्रद्धा घुसल्या तर डोक्यात बिघाड होईल, मेंदू कमजोर होईल आणि माणसाच्या विनाशाचा प्रवास सुरू होईल.
>
> – Volume 3, Lectures from Colombo to Almora, The Work Before Us.

> होऊ शकत नाही. पण प्रधानाच्या समाधानासाठी परत एकदा कुंडली पाहून आपले गणित एकदम बरोबर असल्याचे सांगितले. त्याबरोबर राजाच्या चेहऱ्यावरचा रंग उडाला. तेव्हा प्रधानाने जोतिषाला विचारले, 'तुमचा मृत्यू कधी होणार ह्याबाबत आपणाला काय वाटते?' ज्योतिषी म्हणाला, 'बारा वर्षांनी.' ताबडतोब प्रधानाने आपली तलवार काढली व ज्योतिषाचे मुंडके उडवले व राजाला म्हणाला, 'पाहा महाराज हा खोटारडा तर आत्ताच मेला.'[11]

ह्याच प्रकारे विवेकानंदांनी भूत-प्रेत आणि अंधश्रद्धांवर लोकांनी विश्वास ठेवू नये असेही आव्हान केले होते. ९ फेब्रुवारी १८९७ ला मद्रासच्या ट्रिप्लिकेन लिटरेरी सोसायटी मध्ये दिलेल्या एका व्याख्यानात ते म्हणाले होते:

> कित्येक शतकांपासून आपल्या मनात असलेल्या शेकडो अंधश्रद्धांमधून आपल्याला बाहेर पडायचे आहे. . . . अंधश्रद्धा आणि प्रत्येक गोष्टीला रहस्यमय बनवणे हे कमकुवतपणाचे चिन्ह आहे. हे अवनतीचे आणि मृत्यूचे प्रतीक आहे. . . . समर्थ लोकांनी ह्या अंधश्रद्धांवर आपला वेळ वाया घालवणे, त्यांची व्याख्या करण्यासाठी रूपकांचा शोध घेण्यात आपला वेळ वाया घालवणे हा मानव जातीचा धिक्कार आहे.[12]

लोकांमध्ये अंधश्रद्धा पसरवण्यासाठी ते ब्राह्मणांना जबाबदार मानतात. सामान्य जनतेचे शोषण करण्याच्या हेतूने ब्राह्मणांना लोकांना मागासलेपणात फसवून ठेवायचे आहे असा आरोप ते करतात. २२ ऑगस्ट १८९२ ला हरिदास बिहारीदास देसाई ह्यांना लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात:

> लोक . . . आपल्या जेवण्या-खाण्यासंबंधीच्या स्थानिक अंधश्रद्धांच्या गठडीला आपला धर्म समजतात. ह्या गरीब बिचाऱ्यांना धूर्त पुरोहित वेद-पुराणे आणि हिंदू धर्माच्या नावावर हास्यास्पद आणि वेडसर गोष्टी शिकवत आहेत (आणि लक्षात घ्या की ह्या बदमाश पुरोहित आणि त्यांच्या चारशे पिढ्यांनी देखील वेदांचे एकही पुस्तक पाहिलेसुद्धा नसेल), आणि सामान्य लोक मात्र त्याचंच अनुसरण करून स्वतःला पतित करत आहेत. कलियुगातल्या ह्या ब्राह्मण रूपी राक्षसांपासून ईश्वर त्यांचे रक्षण करो.[13]

देशाच्या प्रगतीमध्ये ब्राह्मणांच्या भूमिकेला ते अडथळा म्हणून पाहत होते. १८९३ मध्ये भारत ते अमेरिका यात्रेदरम्यान योकोहामा (जपान) इथून १० जुलैला आपल्या एका शिष्याला लिहिलेल्या पत्रात ते अत्यंत स्पष्टपणे म्हणतात,

> सदैव प्रगतीच्या मार्गातील अडथळा असलेल्या ढोंगी पुरोहितांना धक्के मारून

बाहेर काढा, कारण ते कधीच सुधारणार नाहीत, त्यांचे मन कधीच मोठे होणार नाही. त्यांचा जन्म शेकडो वर्षांच्या अंधश्रद्धा आणि अत्याचारांमुळे झाला आहे.[14]

१८९५ च्या अखेरीस वराहनगर मठातून त्यांचा मित्र राखाल (स्वामी ब्रम्हानंद) ह्यांना पाठविलेल्या पत्रात ते म्हणतात:

एका विशिष्ट प्रकारच्या साधुसंन्यासी व ब्राह्मणांनी देशाचा विनाश केला आहे. त्यांचा हेतू चोरीमारी आणि दुष्टपणाचा असतो पण ते धर्म शिकवण्याचे ढोंग करतात. भेटवस्तू घेताना ते प्रत्येकाकडून काहीही घेतात, पण त्याचबरोबर 'मला शिवू नका' असाही आरडाओरडा करतात! आणि ते काय महान काम करतात? 'जर बटाट्याचा वांग्याला स्पर्श झाला तर किती वर्षांनी ब्रम्हांड रसातळास जाईल?' 'जर हात स्वच्छ करण्यासाठी बारा वेळा हातांना माती चोळली नाही तर पूर्वजांच्या चौदा पिढ्या नरकात जातील की चोवीस?'—असल्या क्लिष्ट प्रश्नांची गेली दोन हजार वर्षे शास्त्रीय उत्तरे शोधून काढण्यात ते गुंतले आहेत—जेव्हा देशातील एकचतुर्थांश माणसे भुकेने तडफडून मरत आहेत. अष्टवर्षा कन्येचा तीस वर्षाच्या घोडनवऱ्याशी विवाह होत आहे आणि ह्या विवाहाबद्दल आईवडिलांना अत्यानंद होत आहे. . . . आणि जर कोणी ह्याला विरोध केला तर 'तुम्ही आमचा धर्म बुडवत आहात' अशी ओरड केली जाते. तारुण्यात येण्यापूर्वीच मुलींना आई बनवले जाते आणि त्यासाठी शास्त्रीय स्पष्टीकरण दिले जाते, हा कसा धर्म आहे? अनेक लोक तर ह्यासाठीसुद्धा मुसलमानांना दोषी ठरवतात. वा, काय तर्क आहे! एकदा तरी *गृह्यसूत्रे* बारकाईने वाचून पाहा. त्यात मुलीच्या लग्नाचे वय काय दिले आहे ते पाहा. . . . त्यात अगदी स्पष्टपणे सांगितले आहे, की मुलगी तारुण्यात येण्याआधी तिचा विवाह करावा. सर्व *गृह्यसूत्रे* हाच आदेश देतात. आणि वैदिक अश्वमेध यज्ञात तर ह्याहून वाईट गोष्टी करत असत. . . . सर्व ब्राह्मणग्रंथ त्याचा

महान बुद्ध म्हणतात, 'जे तुम्ही ऐकलंय, त्यावर विश्वास ठेवू नका; मागच्या पिढ्यांकडून मिळाले आहेत म्हणून सिद्धांतांवरही विश्वास ठेवू नका; खूप लोक आंधळेपणाने एखादी गोष्ट मानतात म्हणून त्यावर विश्वास ठेवू नका; कोणी वृद्ध महर्षीने सांगितले म्हणून विश्वास ठेवू नका; सवयीमुळे जे सत्य तुम्ही मानता त्यावर विश्वास ठेवू नका; तुमचे शिक्षक किंवा इतर वयोवृद्ध ह्यांनी प्रमाणित केले आहे म्हणून त्यावर विश्वास ठेवू नका. स्वतः विचार करा आणि विश्लेषण करा, आणि त्यानंतर जर तार्किक निष्कर्ष निघाला आणि तो सर्वांसाठी हितकारक वाटला, तर त्यावर विश्वास करा आणि त्याला आपल्या जीवनात अंमलात आणा.'

– Volume 4, Lectures and Discourses, The Claims of Religion.

उल्लेख करतात आणि सर्व भाष्यकार त्याच्या खरेपणाबद्दल ग्वाही देतात.[15]

विवेकानंदांनी लोकांना अंधश्रद्धा सोडून तर्कावर विश्वास ठेवायला सांगितले. २४ मे १८९६ ला दिलेल्या एका व्याख्यानात ते म्हणतात:

> केवळ धर्मग्रंथांवरच विश्वास ठेवायचा असेल तर आपल्याला तर्कबुद्धी कशासाठी मिळाली आहे? तर्काच्या विरुद्ध एखाद्या गोष्टीवर विश्वास ठेवणे ही फार मोठी ईश्वरनिंदा नव्हे काय? ईश्वराने दिलेल्या ह्या श्रेष्ठतम देणगीचा उपयोग न करण्याचा आपल्याला काय हक्क आहे? माझी खात्री आहे, तर्कशक्तीचा वापर करून श्रद्धा न ठेवणाऱ्याला ईश्वर एकवेळ क्षमा करेल, पण त्याने दिलेल्या शक्तींचा उपयोग न करता आंधळेपणाने विश्वास ठेवणाऱ्याला तो क्षमा करणार नाही. अशा व्यक्तींच्या चारित्र्याचे पतन होत जाते आणि त्या जनावरांच्या पातळीला जातात—त्यांच्या इंद्रियांचा ऱ्हास होतो आणि शेवटी मृत्यू.[16]

त्यांनी आपल्या श्रोत्यांना सांगितले की धार्मिक पुस्तकांवर डोळे मिटून विश्वास ठेवू नका. आपल्या व्याख्यानांमध्ये ते नेहमी सांगत असत:

> कुठल्यातरी पुस्तकात सांगितलंय म्हणून कुठल्याही गोष्टीवर विश्वास ठेवू नका. कोणीतरी सांगितले की सत्य आहे म्हणून त्यावर विश्वास ठेवू नका. परंपरेने गौरव केलाय म्हणून कुठल्याही गोष्टी मानू नका. सत्याचा शोध तर्काच्या आधारावर स्वतः करा. तीच जाणीव आहे.[17]

२४ जून १८९५ ला दिलेल्या एका व्याख्यानात ते म्हणाले:

> शास्त्र म्हणजे सर्व काही असे नाहीये. तर्क लावून खरेपणा पाहणे हेच धार्मिक सत्याचे एकमात्र प्रमाण आहे.[18]

> गौतम बुद्ध इतर सर्व धर्मगुरूंपेक्षा जास्त शूर व प्रामाणिक होते. त्यांनी सांगितले की, 'कुठल्याही शास्त्रावर विश्वास ठेवू नका; सारे वेद पाखंड आहेत. जर वेद माझ्या विचारांशी जुळले तर ते वेदांचे सौभाग्य आहे.'
>
> – Vol. 7, Inspired Talks, 10 July

जोपर्यंत देश अंधश्रद्धा, रूढी आणि परंपरा ह्यांच्या गुलामीतून मुक्त होत नाही, तोपर्यंत देशाच्या स्वातंत्र्याला काही अर्थ असणार नाही—ह्यावर जोर देऊन विवेकानंदांनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्याला नवीन पैलू दिला. ते म्हणाले की,

> जे दुसऱ्यांना स्वातंत्र्य द्यायला तयार नाहीत, त्यांना स्वातंत्र्य मिळवण्याचा अजिबात अधिकार नाही. समजा, उद्या इंग्रजांनी तुम्हाला सर्व अधिकार दिले, पण त्यावेळी जे सामर्थ्यवान असतील ते इतरांना गुलाम बनवतील. गुलामांना सत्ता हवी असते इतरांना गुलाम

बनवण्यासाठीच.[19]

विवेकानंद अशा प्रकारे सांस्कृतिक नवजागरणाचे आव्हान करत होते. ते म्हणतात:

> विकासाची पहिली अट आहे स्वातंत्र्य. माणसाला जसं आचार-विचार आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य मिळालं पाहिजे, तसंच खाण्या-पिण्याचे, वेशभूषेचे, विवाहाचे आणि अन्य सर्वच बाबतीत स्वातंत्र्य असावयास हवे, जोपर्यंत इतरांना नुकसात पोहोचत नाही.[20]

आपले मित्र शशी (स्वामी रामकृष्णानंद) ह्यांना १९ मार्च १८९४ ला पाठवलेल्या पत्रात ते म्हणतात:

> आपण एक देश म्हणून आपलं व्यक्तिमत्व हरवून टाकलंय आणि हेच भारतातल्या सर्व प्रकारच्या वाईट गोष्टींचं मूळ आहे. देशाला आपण त्याचे हरवलेले व्यक्तिमत्व मिळवून द्यायचे आहे आणि लोकांची उन्नती करायची आहे.[21]

ह्या पत्रात लोकांच्या उन्नतीसाठी ते एक प्रस्ताव देतात:

> जर काही निःस्वार्थी परोपकारी संन्यासी गावागावात जाऊन नकाशे, कॅमेरे, विश्वाचा गोल व अन्य साधनांच्या आधारे लोकांमध्ये अगदी चांडाळांपर्यंत (कनिष्ठ जात) शिक्षणाचा प्रसार करतील आणि लोकांच्या उन्नतीसाठी वेगवेगळ्या पद्धतीने प्रयत्न करतील, तर भविष्य उज्वल नाही का होणार? . . .
>
> हे काम करण्यासाठी प्रथम आपल्याला लोक पाहिजेत, मग पैसा. गुरूकृपेने मला प्रत्येक शहरात दहा–पंधरा लोक मिळतील असा विश्वास होता. मग मी पैसे जमा करण्यासाठी फिरलो, पण भारतातील लोक कसले पैसे देणार? एक नंबरचे स्वार्थी! ते काय देणार? म्हणून मी अमेरिकेला आलो आहे, स्वतः पैसे कमावेन आणि मग आपल्या देशात परत येऊन माझ्या आयुष्यातले उर्वीरित दिवस हे एकमेव ध्येय साध्य करण्यासाठी समर्पित करेन.

*विवेकानंदांच्या एका शिष्याने त्यांच्यासंबंधित खालील घटना आपल्या डायरीत नमूद केली आहे.*

एकदा स्वामीजींना भेटायला गोरक्षक समितीचे एक प्रचारक आले होते. (गोरक्षण सभेचा उद्देश, उत्पन्नाची साधने, आणि आत्तापर्यंत जमवलेले उत्पन्न ह्याविषयीची माहिती घेतल्यावर) स्वामीजींनी त्या प्रचारकाला विचारले, . . . ‘मध्यप्रदेशात भीषण दुष्काळ पडला आहे. नऊ लाख लोक भुकेने मेली आहेत असे सरकारने घोषित केले

आहे. तुमच्या संस्थेने दुष्काळग्रस्तांना काही मदत केली आहे का?' . . . ह्यावर प्रचारक म्हणाले, 'माणसांच्या कर्मामुळे आणि पापांमुळे हा दुष्काळ पडला आहे. "जसे कर्म तसे फळ".' प्रचारकाचे बोलणे ऐकल्यावर स्वामीजींच्या डोळयातून क्रोधाच्या ठिणग्या बाहेर पडल्या, त्यांचा चेहेरा रागाने लाल झाला. पण स्वतःला सांभाळत ते म्हणाले, '. . . जर तुम्ही म्हणत असाल की माणसे आपल्या कर्माने मरतात, तर . . . ही गोष्ट तुमच्या मुद्यालाही लागू होते. असे म्हटले जाऊ शकते की गोमाताही आपल्या कर्मानेच खाटकाकडे पोहोचतात आणि मारल्या जातात. म्हणूनच ह्याबाबतीत आपण काहीच करता कामा नये.' ह्यावर प्रचारक थोडा सटपटला आणि म्हणाला, 'स्वामी तुम्ही सांगताय ते खरे. पण गाय ही आमची माता आहे, असे आमचे धर्मग्रंथ सांगतात.' स्वामीजी हसून म्हणाले, 'मला समजतंय की गाय आमची माता आहे. इतक्या गुणी मुलांना अजून कोण जन्म देऊ शकणार?' . . . प्रचारक स्वामीजींना नमस्कार करून निघून गेले. तेव्हा स्वामीजी आम्हाला सांगू लागले, 'पहा, कशा आश्चर्यकारक गोष्टी बोलून निघून गेला. माणूस आपल्या कर्माने मरतो, त्याच्यावर दया दाखवून उपयोग काय? आपला देश बर्बाद झाला आहे हेच ह्यावरून सिद्ध होते! . . . ज्या मानवाला मानवाबद्दल संवेदना नाहीत, त्याला मानव म्हणावे का?'*

*२ फेब्रुवारी १८९७ ला मदुराईला दिलेल्या व्याख्यानात विवेकानंदांनी गोहत्येबद्दलचे आपले नेमके विचार अधिक स्पष्टपणे मांडले:*

हे लक्षात घेतले पाहिजे की, आज आपण ज्याला धार्मिक विश्वास म्हणतो, तो निरनिराळ्या ठिकाणच्या लहान-लहान ग्रामदेवता आणि क्षुद्र खुळचट रूढींवर आधारित आहे. स्थानिक रूढी असंख्य आणि परस्पर विरोधीही आहेत. . . . ह्या रूढी म्हणजे खरा धर्म, अशी अज्ञानी लोक समजूत करून घेतात, हीच त्यांची मोठी चूक आहे. . . . एखादी क्षुद्र सामाजिक रूढी बदलली म्हणजे काही तुमचा धर्म बुडत नाही, मुळीच बुडत नाही. लक्षात ठेवा, की रूढी ह्या नेहमीच बदलत आल्या आहेत. भारतात एक काळ असाही होता, की गोमांस खाण्यावाचून ब्राह्मण हा ब्राह्मण राहू शकत नसे; वेदात तुम्हाला आढळेल, की जेव्हा एखादा संन्यासी, राजा किंवा थोर पाहुणा घरी येई तेव्हा उत्तम बैल मारण्यात येत असे. कालांतराने लोकांच्या लक्षात आलं की आपला समाज कृषीप्रधान आहे, उत्तम बैलांची हत्या केल्याने (शेतीचे नुकसान होऊन) वंश समाप्त होईल. म्हणून ही प्रथा बंद पडली व गोहत्या निषिद्ध मानली गेली. आधीच्या काळी अशा अनेक प्रथा प्रचलित होत्या ज्यांना आज आपण भयंकर मानतो. कालांतराने नवीन नीतिनियम बनवावे लागले. कदाचित काळाच्या ओघात हेही समाप्त होतील आणि त्याच्या जागी दुसऱ्या स्मृती तयार होतील. . . . अधिक सोप्या शब्दात सांगावयाचे तर आपल्याला प्रत्येक गोष्टीत आवश्यक आणि अनावश्यक असा फरक

करायला हवा. आवश्यक गोष्टी शाश्वत असतात. अनावश्यक गोष्टी तात्कालिक महत्त्वाच्या असतात आणि जर विशिष्ट काळानंतर त्यांच्या जागी दुसऱ्या अधिक उपयुक्त गोष्टी आणल्या नाहीत, तर त्यांच्यापासून खरा धोका असतो.†

* Volume 6, Conversations and Dialogues, From the Diary of a Disciple (Sharatchandra Chakravarty): I, 1897.

† Volume 3, Lectures from Colombo to Almora, Reply to the Address of Welcome at Madura.

## जातीव्यवस्थेबाबत विवेकानंद

विवेकानंद आपल्या काळाच्या पुढे होते. ज्यावेळेला भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील नेते जातीप्रथेवर स्पष्टपणे टीका करायला संकोच बाळगत होते, त्यावेळेला विवेकानंदांनी शोषणावर आधारित रानटी जातीव्यवस्थेवर खंबीरपणे आवाज उठवला. जातीच्या अनुवांशिकतेला त्यांनी मूर्खपणा म्हटले आणि खालच्या जातीच्या लोकांच्या शिक्षणप्रसारासाठी विशेष प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

विवेकानंदांना आपल्या तरुणवयातच जातीप्रथेमधील निहित अन्यायाबद्दल जाणीव होती. १७ ऑगस्ट १८८९ ला वाराणसी येथील एक कट्टर परंपरावादी हिंदू, प्रमादादास मित्र ह्यांना पाठवलेल्या पत्रात ते लिहितात:

> आपल्या देशातील प्राचीन रूढीनुसार जात जन्मावर आधारित आहे, ह्याबद्दल मला शंका नाही. स्पार्टाच्या लोकांनी तेथील गुलामांवर जसा अत्याचार केला आणि आजही अमेरिकेतील निग्रोंबरोबर जो व्यवहार केला जातो, त्यापेक्षा जास्त अत्याचार आपल्या देशातील शूद्रांवर वेळोवेळी केले गेले आहेत, ह्याबाबत काहीही संदेह नाही.[22]

२ नोव्हेंबर १८९३ ला आपले शिष्य अळसिंगा पेरूमल ह्यांना लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात:

> पुरोहित वर्ग काहीही बरळत असेल, वर्णव्यवस्था केवळ एक सामाजिक व्यवस्था आहे . . . जी आता भारताच्या पर्यावरणामध्ये आपली दुर्गंधी पसरवत आहे . . .[23]

२८ डिसेंबर १८९३ ला हरिपद मित्र ह्यांना पाठवलेल्या पत्रात ते लिहितातः

> आपल्या देशात जो कनिष्ठ जातीत जन्माला येतो, तो कायमचा नष्ट होतो, त्यांच्यासाठी कसलीही आशा नाही. का? किती निर्दयपणा आहे! . . . भारतातील लाखो गरिबांच्या दुःख आणि वेदनांवर खरोखर किती लोक रडत

> असतील? . . . आम्ही त्यांना शिवत नाही, त्यांच्यापासून पळ काढतो. आम्ही माणसे आहोत का? ते हजारो ब्राह्मण—भारतातील दीनदुबळ्या आणि शोषित जनतेसाठी काय करत आहेत? फक्त 'शिवू नका', 'शिवू नका' चे रडगाणे गात आहेत.[24]

विवेकानंद उच्च जातीच्या युवकांना संबोधित करताना त्यांच्या जातीय श्रेष्ठता आणि अस्पृश्यतेसंदर्भातील विचारांवर जोरदार ताशेरे ओढतात:

> आणि तुम्ही लोक कोण आहात? . . . संपूर्ण आयुष्य निरर्थक चर्चा करणारे, व्यर्थ बडबड करणारे . . . आपल्या डोक्यामध्ये शेकडो वर्षांच्या अंधश्रद्धांचा कचरा बाळगून असलेले, शेकडो वर्षांपासून केवळ खाण्या-पिण्याच्या अस्पृश्यतांवर वाद घालत आपली सर्व ताकद नाहिशी करणारे, ज्यांच्या सगळ्या मानवतेला युगानुयुगांच्या सामाजिक अत्याचारांनी पायदळी तुडवले आहे . . .[25]

त्यांनी 'ब्राह्मणांच्या जन्मावर आधारित श्रेष्ठत्वा'ची कडव्या शब्दात टीका केली आहे आणि त्याला 'मिथक' म्हणून उडवून लावले. त्यांनी ब्राह्मणांना सांगितले की त्यांनी ब्राह्मणेतर लोकांना आपल्या समकक्ष आणण्यासाठी काम करावे, 'पण मालकाच्या मानसिकतेतून नाही, अंधश्रद्धा आणि भलत्याच पूर्व-पाश्चिमात्य ढोंगीपणाने भारलेला विकृत अहंकार मनात ठेवून नाही.'[26]

४ जुलै १८९७ ला अल्मोडाहून भगिनी निवेदिता ह्यांना लिहिलेल्या पत्रातून हे सिद्ध होते की विवेकानंद जे बोलत असत तेच करत असत. त्या पत्रात ते लिहितात की बुद्धाच्या काळानंतर पहिल्यांदाच त्यांच्या आश्रमात ब्राह्मण युवकांनी कोणताही जातीय भेदभाव न करता रुग्णांची सेवा केली.[27]

विवेकानंदांनी भारतातील भयानक गरीबी आणि अवनतीला इंग्रजांच्या गुलामीपेक्षा भारतीय जातीव्यवस्थेला जास्त जबाबदार मानले आहे. अमेरिका आणि युरोपच्या अतिशय यशस्वी दौऱ्याहून भारतात परतल्यावर फेब्रुवारी १८९७ मध्ये मद्रासपासून १६० मैल दूर असलेल्या आणि सनातनी ब्राह्मणांचा बालेकिल्ला असलेल्या कुंभकोणम ह्या गावात तेथील ब्रह्मवृंदांसमोर भाषण देताना हा संन्यासी सांगतो:

> मित्रहो, मी तुम्हा सर्वांना काही कडव्या गोष्टींची जाणीव करून देऊ इच्छितो. . . . आपल्या दुरावस्थेला आणि अधःपतनाला इंग्रज नाही तर आपण स्वतः जबाबदार आहोत . . . आपल्या खानदानी पूर्वजांनी सामान्य

> भाग्य नावाची अशी कोणतीही गोष्ट नाही. काहीही असे नाही की जे आपल्याला भाग पाडेल. जे आपण केले आहे त्याचे निराकरण आपण करू शकतो.
>
> – Volume 1, Lectures and Discourses, Soul, God and Religion

लोकांना इतक्या भयानकपणे आपल्या पायाखाली चिरडून टाकले की त्यामुळे ते पूर्णपणे अगतिक झाले आहेत, इतका अनन्वित छळ केलाय की आपण माणूस आहोत हेच ते विसरून गेले आहेत. शेकडो वर्षे त्यांना केवळ लाकडे कापण्यासाठी आणि पाणी भरण्यासाठी भाग पाडले. त्यावर कडी म्हणजे त्यांची अशी समजूत घातली गेली की त्यांचा जन्म गुलाम म्हणूनच झाला आहे . . . एवढेच नाही तर अनुवांशिकतेसारख्या ढोबळ संकल्पनांवर आधारित क्रूर युक्त्या . . . सादर केल्या जातात ज्यायोगे ह्या पददलितांचे अजूनच शोषण आणि पिळवणूक केली जाऊ शकेल.[28]

ते पुढे जाऊन असं लिहितात की:

ज्या दिवशी 'म्लेंच्छ' शब्दाचा आविष्कार केला गेला आणि त्यांना दुसऱ्यांबरोबर संबंध ठेवायला बंदी घातली गेली, त्याच दिवशी भारताचा सर्वनाश निश्चित केला गेला.[29]

२४ जानेवारी १८९४ ला आपल्या शिष्यांना लिहिलेल्या पत्रातील मजकुरावरून असा स्पष्ट अर्थ निघतो की विवेकानंदांना जातिव्यवस्था संपवायची होती.

मला असे वाटते की, सर्वात कनिष्ठ आणि गरीब लोकांपर्यंत हा उदात्त विचार पोहोचला पाहिजे की भारतात आणि भारताबाहेर मानवजातीचा विकास झाला आहे, आणि मग त्यांना स्वतःला विचार करण्यासाठी वेळ दिला पाहिजे. . . . विचारांचे आणि कामाचे स्वातंत्र्य ही आयुष्य, प्रगती आणि कल्याण साधण्याची एकमेव अट आहे. जिथे स्वातंत्र्य नाही, तिथे व्यक्ती, समाज आणि राष्ट्राची अवनती निश्चित आहे.

जाती असो वा नसो, पंथ असो वा नसो, जो माणूस, वर्ग, जात, राष्ट्र अथवा संस्था कुठल्याही व्यक्तीच्या स्वतंत्र विचार आणि कृतीवर प्रतिबंध घालते—जरी त्यामुळे दुसऱ्यांना नुकसान पोहोचत नसले तरी—ती राक्षसी आहे आणि तिचा नाश अटळ आहे.[30]

९ एप्रिल १८९४ ला अळसिंगा ह्यांना लिहिलेल्या पत्रात ते आशा व्यक्त करतात की:

भारतातील थोर विचारवंतांमध्ये बुद्धदेव हेच असे एकमेव आहेत की ज्यांना जाती मान्य नव्हत्या. आता त्यांचा एकही शिष्य भारतात उरलेला नाही. इतर सर्वच दार्शनिकांनी सामाजिक पूर्वाग्रहांना कुरवाळले आहे. म्हणूनच ते कितीही मोठे असले तरी त्यांच्यात स्वार्थीपणा शिल्लक राहिला आहे.

– Volume 7, Inspired Talks, 9 July 1895.

(असा दिवस) नक्की येईल की जेव्हा एकच जात असेल . . .[31]

विवेकानंद दलितांच्या शिक्षणाचे खंदे समर्थक होते. १८९५ ला राखाल ह्यांना लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात:

> जर विषमता आहे . . . तर बलवान माणसापेक्षा दुर्बळ माणसाला अधिक संधी दिली गेली पाहिजे.
>
> दुसऱ्या शब्दात सांगायचे तर, ब्राह्मणांपेक्षा चांडाळांना शिक्षणाची जास्त आवश्यकता आहे. ब्राह्मण मुलाला जर एक शिक्षक लागत असेल तर चांडाळ मुलांना दहा शिक्षक हवे.[32]

खालच्या जातीतील लोकांना प्रगती करणे शक्य व्हावे ह्यासाठी त्यांनी ब्राह्मणांना आपले विशेष अधिकार सोडण्याचे आवाहन केले. विवेकानंद केवळ येथेच थांबत नाहीत, पुढे जाऊन त्यांनी कनिष्ठ जातींसाठी १०० टक्के आरक्षणाची मागणीही केली:

> हे ब्राह्मणांनो . . . ब्राह्मणांच्या शिक्षणावर पैसे खर्च करू नका, उलट अस्पृशांवर खर्च करा. कमकुवत लोकांना प्रथम मदत करा, कारण त्यांना दानाची सगळ्यात जास्त गरज आहे. ब्राह्मण जर जन्मानेच विद्वान आहेत तर कुठल्याही मदतीशिवाय ते शिक्षण घेऊ शकतात. पण जर दुसरे लोक जन्मतः बुद्धिमान नाहीत तर त्यांना सर्व प्रकारचे शिक्षण आणि शिक्षक मिळवून दिले पाहिजेत. मला हेच न्याय्य व तर्कसंगत आहे असे वाटत.[33]

## विवेकानंद आणि धर्म

*आपणाला नवा धर्म, नवा देव आणि नवे वेद हवे आहेत.*

विवेकानंदांची धर्माबद्दलची मांडणी अतिशय सोपी आणि सुंदर आहे:

> सर्वांच्या चांगल्यासाठी आणि आनंदासाठी आपले आयुष्य वेचणे हाच धर्म आहे.[34]

विवेकानंद एक अपारंपरिक हिंदू संत होते. त्यांचे धर्माबद्दलचे विचार हिंदू कट्टरपंथीयांच्या प्रसार-प्रचाराच्या अगदी उलट आहेत. अन्य धर्मांविरोधात द्वेष भडकविण्यासाठी संघपरिवार विवेकानंदांच्या प्रतिमेचा वापर करतो, कारण लोकांना विवेकानंदांचे खरे विचार माहीत नाहीत. विवेकानंद मानत असत की सर्व खरे धर्म एकसारखेच आहेत आणि त्यांचे आदर्शही समान आहेत,

> एका धर्माचा खरेपणा इतर सर्व धर्मांच्या खरेपणावर अवलंबून असतो. . . . जर एक धर्म खरा असेल तर सर्वच धर्म खरे आहेत.[35]

त्यांचे असे म्हणणे होते की,

> सर्व धर्मांचा एकच आदर्श आहे—स्वातंत्र्य प्राप्ती आणि दुःखापासून मुक्ती![36]

डिसेंबर १९६६ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या सर्वसाधारण सभेने *नागरिक आणि राजकीय अधिकारांचा आंतरराष्ट्रीय करारनामा* स्वीकारला. त्याच्या अठराव्या परिच्छेदात असे म्हटले आहे की:

- सर्वांना आपल्या इच्छेनुसार धर्म मानण्याचा अथवा न मानण्याचा अधिकार आहे.
- पूजा-अर्चा, रीतीरिवाज आणि वागणुकीद्वारे सर्वांना आपला धर्म व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य आहे.
- स्वेच्छेनुसार धर्म मानण्याच्या स्वातंत्र्यावर गदा येईल अशा पद्धतीने कोणी कोणावर जबरदस्ती करू शकत नाही.

जगभरातल्या देशांनी हा करार स्वीकारला त्याच्या सत्तर वर्ष आधी विवेकानंदांनी सर्व धर्मांचा आदर आणि प्रतिष्ठा राखण्याचा संदेश दिला होताः

> सर्व धर्मांमध्ये आपापसात बंधुत्वाची भावना असण्याची गरज आहे, कारण त्यांचं जगणं पण एकत्रच आहे आणि मरण पण एकत्रच आहे. बंधुत्वाची ही भावना परस्परांवरील स्नेह आणि आदर ह्यावर आधारित असली पाहिजे.[37]

हिंदू कट्टरपंथीय विचारही करू शकणार नाहीत अशा गोष्टी विवेकानंद सांगतात. प्रेषित मुहम्मद हे 'समतेचे संदेशवाहक' आणि 'बंधुत्वाचे पैगंबर' आहेत असे त्यांनी म्हटले आहे.[38] १० जून १८९८ ला मुहम्मद सरफराज हुसैन ह्यांना लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात:

> जर कोणत्या धर्माने समानतेला उत्तम रीतीने आपलेसे केले असेल तर तो इस्लाम आणि फक्त इस्लामच आहे.[39]

भारताच्या मिश्र संस्कृतीची त्यांना जाणीव होती. १९ नोव्हेंबर १८९४ ला मद्रासमधील आपल्या शिष्यांना लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात की हिंदूंनी मुसलमानांकडून 'भौतिक सभ्यतेची' अनेक तत्त्वे शिकून घेतली, जसे शिवलेले कपडे परिधान करणे आणि खाण्यापिण्याची स्वच्छता.[40] विवेकानंदांनी आग्रहाने सांगितले आहे की, ह्या देशाचा अभ्युदय करायचा असेल, भविष्यकाळात देशाला 'गौरवशाली आणि अजिंक्य' करायचे असेल तर सर्व धर्मात केवळ सहकार्यच नव्हे तर संगम हवा. सरफराज ह्यांना लिहिलेल्या वरील पत्रात ते पुढे लिहितात की:

> माझी अगदी पूर्णपणे खात्री पटली आहे, की वेदान्तवादाचे सिद्धान्त कितीही चांगले व सुंदर असले तरी जोपर्यंत व्यावहारिक इस्लामची जोड त्यांना दिली

जात नाही तोपर्यंत त्याचा मानवजातीच्या विशाल समूहासाठी काडीचा उपयोग नाही. . . .

आपल्या मातृभूमीसाठी ह्या दोन महान व्यवस्था—हिंदू आणि इस्लाम—वेदांती मेंदू आणि इस्लामी शरीर—ह्यांचा मिलाप हीच एकमात्र आशा आहे.[41]

१८९० ते १८९३ ह्या कालावधीत परिव्राजक म्हणजे भटका संन्यासी म्हणून हिंडत असताना विवेकानंदांनी देशातील गरिबी व धार्मिक मागासलेपणाशी आणि ब्राह्मणी साधूंकडून होणाऱ्या शोषणाशी असलेले नाते अत्यंत जवळून पाहिले. अस्वस्थ होऊन त्यांनी ह्या देशाच्या भयावह परिस्थितीचे वर्णन पत्रांमधून आपल्या मित्रांसमोर मांडले. ती पत्रे म्हणजे जणू अग्निफुले किंवा निद्रिस्त ज्वालामुखीचे पहिले हुंकार. एका पत्रात त्यांनी लिहिले:

ज्या देशातील कोटी कोटी लोक फक्त मोहाची फुले खाऊन जगतात आणि दहा–वीस लाख साधू आणि कोट्यवधी ब्राह्मण गरिबांचे रक्त शोषतात, पण त्यांच्या उन्नतीसाठी काहीही करत नाहीत, त्याला देश म्हणावे की नरक? हा काय धर्म आहे की सैतानाचे तांडव?[42]

हिंदू–मुस्लिमांमध्ये फाटाफूट करण्यासाठी धार्मिक कट्टरपंथीय करत असलेल्या खोट्या प्रसाराच्या विरोधात विवेकानंदांनी लोकांना इशारा दिला. अशाच प्रकारचा एक खोटा प्रसार आहे जबरदस्ती धर्मांतराचा. विवेकानंदांनी किमान दोन पत्रांमध्ये ह्या धडधडीत खोट्या प्रचाराचा मुखवटा फाडला आहे. ह्या पत्रांचा सारांश हा की ह्या देशातील धर्मांतरे ख्रिश्चन आणि मुसलमान ह्यांनी केलेल्या अत्याचारांमुळे नव्हे तर उच्चवर्णीयांनी केलेल्या अत्याचारांमुळे झाली आहेत.

**पत्र–१: खेतरीनिवासी पंडित शंकरलाल शर्मा ह्यांना, २० सप्टेंबर १८९२:**

जर कोणी भंगी आपल्याकडे आला, तर आपण त्याच्यापासून दूर पळतो, जणुकाही आपल्याला संसर्गजन्य रोग लागेल. पण जेव्हा एखादा पाद्री त्याच्या डोक्यावर वाडगाभर पाणी टाकतो, प्रार्थनेत काहीतरी पुटपुटतो, परिधान करण्यासाठी त्याला जुना-फाटका का असेना पण एक कोट देतो, तेव्हा जर त्याने अतिशय कट्टरपंथी हिंदूच्या घरात प्रवेश केला, तर त्यावेळी असे कोणीही असणार नाही जे प्रेमाने हस्तांदोलन करून त्याला बसायला खुर्ची द्यायला नकार देईल. ह्यापेक्षा अधिक विडंबना काय असू शकते? . . . भारतातील सर्वाधिक पुरोहितवर्ग त्रावणकोरमध्ये असून तेथील सर्व जमिनीवर ब्राह्मणांची मालकी आहे . . . तिथे तब्बल एकचतुर्थांश लोक ख्रिस्ती बनले आहेत. आणि मी त्यांना दोष देऊ शकत नाही . . .[43]

**पत्र–२: हरिदास बिहारीलाल देसाई ह्यांना, नोव्हेंबर १८९४:**

> भारतातील गरिबांमध्येच इतक्या मोठ्या प्रमाणात मुसलमान का आढळतात? तलवारीच्या जोरावर त्यांनी धर्मांतर केले असे म्हणणे महामूर्खपणाचे होय. त्यांनी धर्मांतर केले . . . जमीनदार आणि . . . पुरोहितांच्या कचाट्यातून सुटण्यासाठी म्हणून बहुसंख्य जमीनदार असलेल्या बंगालमध्ये मुसलमान शेतकऱ्यांची संख्या हिंदू शेतकऱ्यांपेक्षा अधिक आढळून येते. ह्या लाखो अवनत व दलित माणसांच्या उद्धाराची चिंता कुणाला आहे?[44]

आज आरएसएस आणि त्यांची पिल्लावळ मुसलमान आणि ख्रिश्चनांच्या विरोधात कमी तीव्रतेची, सतत चालणारी हिंसक मोहीम राबवत आहेत, जेणेकरून ते दबलेले आणि घाबरलेले राहतील आणि परत हिंदू बनतील, किंवा दुय्यम दर्जा स्वीकारून आपण बहुसंख्यांक हिंदूंच्या दयेवर राहत असल्याचे मान्य करतील. विवेकानंदांची शिकवण ह्याच्या अगदी विरोधात आहे. त्यांनी जबरदस्तीने धर्मांतर आणि पुनःधर्मांतरण ह्याला विरोध केला आहे, जे ‘घर वापसी’च्या नावाखाली आरएसएस करत आहे:

> जी व्यक्ती घाबरून धर्मामध्ये येते तिचा कोणताच धर्म नसतो.[45]

विवेकानंद जेव्हा सर्व समुदायांसाठी समान आदराची गोष्ट बोलतात, तेव्हा ते स्पष्ट करतात की ह्याचा अर्थ दुसऱ्यांसाठी सहिष्णू असणे नाही. ह्याउलट ते सहिष्णुतेला ‘ईश्वराची निंदा’ म्हणतात. ते म्हणतात:

> सहिष्णु असण्याचा अर्थ आहे की मला वाटत तू चुकला आहेस आणि मी दयाळूपणे तुला जगू देतोय. तुम्ही किंवा मी कोणाला दयाळूपणे जगू देतोय असा विचार करणे म्हणजे ईश्वराची निंदा नाही का?[46]

आणि म्हणून ते म्हणतात की:

> आपले ब्रीदवाक्य स्वीकृती असली पाहिजे, बहिष्कार नव्हे. . . . भूतकाळातील सर्व धर्मांचा स्वीकार करून मी सर्वांसोबत आराधना करेन. प्रत्येक संप्रदाय ज्या भावनेने ईश्वराची आराधना करतात, त्याच भावनेने मी त्यांच्यासह ईश्वराची पूजा करेन. मी मुसलमानांबरोबर मशिदीत जाईन, ख्रिश्चनांबरोबर चर्चमध्ये जाऊन क्रुसावरील ख्रिस्ताच्या मूर्तीसमोर गुडघे टेकून प्रार्थना करेन, बुद्ध मंदिरात प्रवेश करून बुद्ध आणि त्याच्या धम्माचा आश्रय घेईन.[47]

जो विधवांचे अश्रू पुसू शकत नाही आणि अनाथांच्या तोंडी अन्नाचा घास देऊ शकत नाही, अशा देवावर किंवा धर्मावर माझा विश्वास नाही.

– Volume 5, Epistles—First Series, XXI, Alasinga, 27 October 1894.

विवेकानंद कोणत्याही समुदायाद्वारा आपली धार्मिक मूल्ये दुसऱ्यावर लादण्याच्या कट्टर विरोधात होते. आज धर्मांध शक्ती अल्पसंख्यांक असलेल्या ब्राह्मणांच्या खाण्यापिण्याच्या सवयी सर्वांवर आणि विशेषतः मुसलमानांवर थोपवण्याची एक हिंसात्मक मोहीम राबवत आहेत, अशा वेळी विवेकानंदांच्या ह्या न्याय्य शब्दांची आठवण करून देणे गरजेचे आहे:

> आम्ही प्रत्येकाला त्याच्या इच्छेनुसार माहिती घेण्याचे, निवडीचे आणि अनुसरण करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य देतो. उदाहरणार्थ कुणाला मांसाहार ठीक वाटत असेल तर दुसऱ्या कोणाला फलाहार. प्रत्येकाचं वैशिष्ट्य स्वागतार्ह आहे, पण त्याला दुसऱ्यांच्या व्यवहारावर टीका करण्याचा अधिकार नाही . . . दुसऱ्यांनी आपलेच अनुसरण करावे ह्यासाठी त्यांच्यावर दबाव टाकण्याचा अधिकार तर अजिबात नाही. . . .
>
> धर्माची ही प्रचंड मोठी चूक होती की त्यांनी सामाजिक बाबींमध्ये लुडबुड केली. . . .
>
> पुरोहितांनी प्रत्येक सामाजिक बाबींमध्ये हस्तक्षेप करण्याची (जे लाखो लोकांसाठी दुःखदायक आहे) गरजच काय?[48]

स्वामी विवेकानंदांचे एक अनुयायी स्वामी अखंडानंद बंगालमध्ये अनाथाश्रम बांधत होते. तेव्हा विवेकानंदांनी त्यांना लिहिले:

> सर्व धर्मांच्या मुलांना सामील करा—हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन . . .

आणि पुढे सल्ला दिला:

> पण त्यांच्या धर्मात लुडबुड करू नका. तुम्हाला फक्त त्यांच्या जेवण आदीची वेगळी व्यवस्था करावी लागेल . . .[49]

विवेकानंदांनी कायम धार्मिक मूलतत्त्ववादाच्या विरोधात भूमिका घेतली होती. मूलतत्त्ववादी शक्ती समाजामध्ये निर्माण करत असलेल्या जातीय तेढ, हिंसा आणि रक्तपात

> जर काही चांगले व्हायला हवे असेल, तर उत्सवी गोष्टींचा त्याग करून देहधारी मनुष्याच्या रूपात असलेल्या जीवित इश्वराची पूजा करा . . . काशी आणि वृंदावनच्या देवळांचे दरवाजे उघडणे आणि बंद करण्यासाठी लाखो रुपये खर्च केले जातात. कधी देव कपडे बदलत आहेत, कधी जेवत आहेत, तर कधी झोपले आहेत . . . तर दुसरीकडे जेवणाविना आणि शिक्षणाविना जिवंत देव मरत आहेत. मुंबईतील मारवाडी कीटकांसाठी हॉस्पिटल बांधत आहेत, पण माणसांकडे त्यांचे लक्ष नाहीये, ते जगोत वा मरोत.
>
> – Volume 6, Epistles—Second Series, XLV, Brother Disciples, 1894.

ह्याबाबत त्यांनी आपली तीव्र वेदना व्यक्त केली. ते म्हणाले की:

> धर्माने मानवी जीवनाला सगळ्यात जास्त आशीर्वाद दिला आहे पण त्याचवेळी धर्माने सर्वाधिक भयावहता निर्माण केली आहे. धर्माने शांतता आणि प्रेम ह्यांचा संदेश सर्वाधिक पसरविला आहे, आणि त्याचबरोबर धर्मानेच सर्वात भयानक द्वेष निर्माण केला आहे. धर्माने मानवांमध्ये बंधुभावाची मूर्त कल्पना दिली, आणि धर्मानेच माणसा-माणसांमध्ये कठोर शत्रुत्वाच्या भावनेलाही जन्माला घातले. धर्मांनीच सगळ्यात जास्त धर्मादाय रुग्णालयांची स्थापना केली—केवळ माणसांसाठीच नव्हे तर जनावरांसाठीही, आणि त्याचबरोबर धर्मांनीच जगात महाभयंकर रक्तपात घडविला आहे.[50]

विवेकानंद म्हणतात की ही सर्व चराचर, ज्ञानेंद्रिये, बुद्धी आणि तार्किकतेची सृष्टी दोन्ही बाजूंनी अज्ञाताने घेरलेली आहे. माणूस फक्त ज्ञात आणि खाणे-पिणे ह्यावर समाधानी राहू शकत नाही. मानवजातीच्या सुरुवातीपासूनच माणसाने अज्ञाताला जाणून घेणे, अंतापलीकडे जाऊन शोध घेणे, आणि आपल्या ज्ञानेंद्रियांच्या पलीकडे जाणे ह्यासाठी सतत संघर्ष केला आहे. धर्माच्या उगमाचे हेच खरे कारण आहे. धार्मिक विचार हा माणसाच्या जडणघडणीचाच एक भाग आहे.[51] म्हणूनच धर्माने निर्माण केलेल्या वाईट गोष्टींना सामोरे जायचे असेल, तर ते ह्या धर्माचा आधार घेऊनच करायला लागेल. म्हणूनच सरफराज ह्यांना लिहिलेल्या वरील पत्रात ते लिहितात:

> ज्या ठिकाणी वेद नाही, कुराण नाही आणि बायबलही नाही, अशा ठिकाणी आपणाला मानव जातीला घेऊन जायचे आहे. मात्र हे काम आपणाला वेद, कुराण आणि बायबल ह्यांचा मेळ घालूनच करावे लागेल.[52]

विवेकानंदांच्या पत्रातील पुरोगामी विचार प्रतिगामी धर्मांध शक्तींच्या सर्वात मूलभूत विचारांना ढासळवून टाकतात. त्यांच्या शिकवणीला विकृत करूनच संघपरिवाराने विवेकानंदांची प्रतिमा हिंदूत्वाचे प्रतीक म्हणून सादर केली आहे. उदाहरणार्थ, विवेकानंद भूतकाळातील घटनांच्या खोट्या प्रशंसेचा तिरस्कार करतात, पण आज मात्र हे दाखवण्याचा प्रयत्न केला जातोय की प्राचीन भारतात विमाने, गाड्या आणि अनुवांशिक विज्ञान होते. विवेकानंद शोक प्रदर्शित करताना म्हणतात:

> हे भगवान, आमचा देश सतत भूतकाळातच रममाण होण्यातून कधी मुक्त होणार?[53]

ते पुढे लिहितात:

> प्राचीन काळामध्ये अनेक चांगल्या गोष्टी होत्या, पण वाईट गोष्टीही होत्या.

> चांगल्या गोष्टी राखून ठेवायच्या आहेत, पण आपल्याला जो देश घडवायचा आहे, तो भविष्यातील भारत प्राचीन भारतापेक्षाही अधिक महान असला पाहिजे.[54]

जेव्हा डॉ. श्रीराम लागूंचा *देवाला रिटायर करायची वेळ आली आहे* हा लेख आला होता, त्यावेळी जोरदार वाद-विवाद झाले हे आपणाला माहीत आहे. पण लोकांना हे माहीत नाही की विवेकानंदांनी मात्र लागूंच्या शंभर वर्षे आधी, २७ एप्रिल १८९६ रोजी, आलमबाजार मठातील आपल्या गुरूबंधूंना लिहिलेल्या पत्रात असेच विचार व्यक्त केले होते. ह्या पत्रात ते लिहितात की आपले देव आता थोडे जुने झाले आहेत. आणि जाहीर करतात की:[55]

> आपल्याला नवा देव, नवा धर्म आणि नव्या वेदांचा नवा भारत घडवण्याची गरज आहे.

आरएसएस आणि त्यांच्या शाखांच्या माध्यमातून धार्मिक मूलतत्ववादी भारतीय संविधानाची मोडतोड करण्याची मोहीम चालवत आहेत, आणि देशाची धर्मनिरपेक्ष रचना नष्ट करून भारताला हिंदू राष्ट्र बनवू इच्छितात. विवेकानंदांचे विचार पूर्णपणे ह्याविरुद्ध आहेत. आरएसएस च्या जन्मापूर्वी तीन दशके आधी, जेव्हा धार्मिक राष्ट्रवादाचा राक्षस नुकताच जन्माला येत होता, तेव्हा विवेकानंदांनी हे आवाहन केले होते की:

> धर्माला कुठलाही पंथ, जाती वा राष्ट्रीय कल्पनांशी जोडण्याचा विचार सोडून द्यायला लागेल. प्रत्येक जमातीचा किंवा देशाचा आपला आपला वेगळा देव असणे आणि दुसऱ्यांना चुकीचे म्हणणे ही एक अंधश्रद्धा आहे, तिला इतिहासजमा करावे लागेल. ह्या विचारांतून मुक्त व्हायला लागेल.[56]

## समाजवादी विवेकानंद

१८९० ते ९३ ह्या तीन वर्षात ह्या भटक्या संन्याशाने संपूर्ण भारत पालथा घातला. त्यासाठी ते पायी हिंडले, घोड्यावरून व रेल्वेतून हिंडले, भंग्याबरोबर बसून चिलीम ओढली, झोपडपट्टीत गरिबांसोबत राहिले, अबूच्या पहाडात चंपा नावाच्या गुहेत एका मुसलमानाच्या घरी राहिले, टिळकांच्याबरोबर गायकवाड वाड्यात आणि खेतरी नरेशांच्या राजवाड्यात असा सर्वत्र मुक्काम केला. ह्या तीन वर्षांच्या अथक भटकंतीत त्यांनी कुठल्याही प्रकारचे धार्मिक अध्ययन न करता भारतातील लोकांचे नेमके प्रश्न समजून घेण्यावर भर दिला. ह्या देशाच्या भयावह परिस्थितीचा आलेख त्यांनी पत्रांमधून आपल्या मित्रांसमोर मांडला आहे.

१९ नोव्हेंबर १८९४ रोजी न्यूयॉर्क येथून आपल्या मद्रास येथील शिष्यांना उद्देशून त्यांनी

जे पत्र पाठवलंय, त्यात ते लिहितात:

> जो ईश्वर मला इथे अन्न देऊ शकत नाही, तो स्वर्गात मला अनंत सुखात ठेवू शकेल ह्यावर माझा विश्वास नाही. भारताचा उद्धार करावयास हवा, गरिबांना पोटभर अन्न द्यावयास हवे, शिक्षणाचा प्रसार करावयास हवा आणि पुरोहितगिरी नष्ट करावयास हवी. पुरोहितांचा जुलूम नको, सामाजिक अत्याचार नको. प्रत्येकाला पोटभर अन्न आणि जीवनात पुढे येण्याची अधिकाधिक संधी मिळावयास हवी.[57]

लोकांची उन्नती करणे म्हणजे त्यांना फक्त अन्न व शिक्षण उपलब्ध करणे नव्हे तर त्यांना एक माणूस म्हणून त्यांची प्रतिष्ठा परत मिळवून देण्याची गरज आहे. विवेकानंदांना ह्या गोष्टीची जाणीव होती. शिकागोहून २० जून १८९४ ला हरिदास बिहारीदास देसाई ह्यांना पाठवलेल्या पत्रात ते लिहितात:

> खरा देश झोपडपट्ट्यांमध्ये राहत असून आपले मनुष्यत्व विसरून गेला आहे, त्याने आपले व्यक्तिमत्व गमावले आहे. हिंदू, मुसलमान, ईसाई—सर्वांच्या पायदळी तुडवले गेलेले हे लोक आता असे समजायला लागले आहेत की ज्याच्या जवळ भरपूर संपत्ती आहे, अशांच्या पायदळी तुडवून घेण्यासाठीच मुळी आपला जन्म झाला आहे. त्यांचे हरवलेले व्यक्तिमत्व त्यांना परत मिळवून द्यायला लागेल.[58]

पण लोकांना त्यांच्या भयाण स्थितीतून बाहेर काढणे, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे, त्यांचा हरवलेला मान-सन्मान आणि व्यक्तिमत्व परत मिळवून देणे एवढे सोपे नाही. विवेकानंद आपली व्यथा आणि हताशपणा अळसिंगा ह्यांना लिहिलेल्या पत्रात व्यक्त करतात:

जनसमुदायाची उपेक्षा हे आमचे सगळ्यात मोठे राष्ट्रीय पाप आहे असे मी समजतो. आमच्या अवनतीचे ते एक कारण आहे. जोपर्यंत भारतातील सर्वसामान्य जनता परत एकदा सुशिक्षित होत नाही, त्यांना चांगला आहार मिळत नाही आणि त्यांची काळजी घेतली जात नाही तोपर्यंत आम्ही कितीही राजकारण केले, तरी त्याचा उपयोग होणार नाही. ते आपल्या शिक्षणासाठी पैसे देतात, ते आपल्यासाठी मंदिरे बांधतात आणि त्याबदल्यात आपण त्यांना लाथा मारतो. व्यवहारात तर ते आपले गुलाम आहेत. आपल्याला जर भारताला नवचैतन्य द्यायचे असेल तर आपल्याला त्यांच्यासाठी काम करायला लागेल.

– Volume 5, Interviews, The Missionary Work of the First Hindu Sannyasin to the West, February 1897.

> मी अध्यात्मिक शास्त्रज्ञ नाही, तत्त्वज्ञ नाही व संतही नाही. मी गरीब आहे आणि गरिबांबद्दल मला प्रेम वाटते. ह्या देशात ज्यांना गरीब म्हटले जाते, त्यांच्याविषयी संवेदनशील असणारे किती हे मी पाहतो. . . . दारिद्र्य आणि अज्ञान ह्यांमध्ये रुतून बसलेल्या वीस कोटी स्त्री-पुरुषांबद्दल कुणाचे मन कळवळते का? ह्या परिस्थितीतून बाहेर पडण्याचा मार्ग कोणता?[59]

त्यानंतर दोन वर्षांनी, गहन चिंतनानंतर १ नोव्हेंबर १८९६ रोजी, आपली जवळची शिष्या कुमारी मेरी हेल ह्यांना लंडनहून पाठविलेल्या पत्रात ते जाहीरपणे सांगतात:[60]

> मी समाजवादी आहे.

ते वर्ष १८९६ होते आणि विवेकानंद त्यावेळी ३३ वर्षांचे होते. त्यांनी हे विधान अचानक लहर आली म्हणून केलेले नाही. प्रचंड अनुभव आणि सखोल विचारांती ते आपल्याला समाजवादी म्हणवून घेतात. त्यापूर्वी तीन वर्षे त्यांनी परिव्राजक म्हणून संपूर्ण भारत फिरून

**स्त्रीमुक्ती संदर्भात**

> स्त्रियांची अवस्था सुधारल्याशिवाय जगाचे कल्याण होण्याची अजिबात शक्यता नाही. पक्षांना एका पंखाने उडता येणे शक्य नाही. . . .
>
> भारतात दोन वाईट गोष्टी आहेत – स्त्रियांना पायाखाली चिरडणे आणि गरिबांना जातीय निर्बंध लावून भरडणे.

– Volume 6, Epistles—Second Series, LXXV, 1895.

*अमेरिकेतून आपल्या शिष्यांना पाठविलेल्या पत्रात त्यांनी म्हटलंय की:*

> (अमेरिका) एवढे संपन्न आहे, शिक्षित आहे, मुक्त आहे, ऊर्जावान आहे. पण आम्ही का गुलाम, दुःखी आणि मृत आहोत? त्याचे उत्तर स्पष्ट आहे.
>
> . . . (इथे, अमेरिकेत,) वीस-पंचवीस वर्षाच्या आधी फारच कमी स्त्रियांची लग्ने होतात, आणि त्या मुक्त पक्ष्यांप्रमाणे विहारत असतात. त्या बाजारात, शाळा-कॉलेजात जातात, पैसे कमावतात आणि सर्व प्रकारची कामे करतात. . . . आणि आपण काय करतो? मुलींनी अनैतिक वर्तन करू नये किंवा भ्रष्ट होऊ नये म्हणून अकराव्या वर्षाच्या आतच त्यांची लग्ने लावून देतो. . . . तुम्ही तुमच्या महिलांची स्थिती सुधारू शकता? तरच तुमचे कल्याण होण्याची आशा केली जाऊ शकते. नाहीतर तुम्ही असेच मागासलेले राहाल.

– Volume 5, Epistles—First Series, VI, 28 December 1893.

खूप जवळून लोकांची गरिबी आणि मागासलेपण बघितले होते. त्यानंतर तीन वर्षे पाश्चिमात्य देशांमध्ये प्रवास केला. प्रगत देशांमधील अनेक गोष्टींनी ते प्रभावित झाले, पण त्याचबरोबर अमेरिका आणि युरोपमधील उदारमतवादी लोकशाहीच्या मर्यादाही त्यांना समजल्या:

> जे स्वतः काहीच काम करत नाहीत पण लाखो लोकांच्या श्रमाचा वापर करून घेतात, अशा काही मूठभर लोकांच्या हातात देशातील संपत्ती आणि सत्ता आहे. ह्या ताकदीच्या जोरावर ते संपूर्ण जगभरात रक्ताचे महापूर घडवून आणू शकतात. धर्म आणि इतर सर्व गोष्टींना त्यांनी पायाखाली दाबून ठेवले आहे; तेच सत्ताधीश आहेत आणि ते सर्वोत्तम समजले जातात. आज पाश्चिमात्य जगावर असेच काही मूठभर धूर्त लोक राज्य करतात. त्यांच्याबाबत तुम्ही जे जे ऐकले आहे—कायद्याचे सरकार, स्वातंत्र्य, मुक्ती, संसद—ते सगळे एक विनोदच आहे.[61]

अनेक वर्षांच्या खोल विचारानंतर विवेकानंद ह्या निष्कर्षावर पोहोचले की भारतातील गरीबी आणि मागासलेपणावर उपाय समाजवादामध्येच आहे. मेरी हेल ह्यांना लिहिलेल्या पत्रात विवेकानंद समाजवादाच्या शक्तीबाबत सांगतात, की समाजात समता येईल, गरिबांची आर्थिक स्थिती सुधारेल आणि शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार होईल. पण स्वतःला समाजवादी म्हणून जाहीर करत असतानाच विवेकानंद समाजवाद ही एक परिपूर्ण रचना आहे असे मानत नव्हते, कारण त्यामुळे 'संस्कृतीचा दर्जा कमी होऊ शकतो' आणि कदाचित 'असामान्य प्रतिभावान माणसे कमी निर्माण होतील'.[62] आणखी एका ठिकाणी[63] ते म्हणतात की ह्यामध्ये व्यक्तिगत स्वातंत्र्याचे हनन होण्याची शक्यता आहे.*

तरीही ते पुढे लिहितात:

> समाजवाद ही परिपूर्ण रचना आहे म्हणून मी समाजवादी आहे असे नाही, पण भाकरी न मिळण्यापेक्षा अर्धी भाकरी मिळणे चांगले आहे. आजवर इतर सर्व व्यवस्था अनुभवून झाल्या असून त्यामध्येही कमतरता होत्या. आता हा प्रयोग होऊ द्या . . .[64]

विवेकानंदांचे स्वप्न होते की समाजवाद फक्त भारतात नाही तर सर्व जगभर येईल, आणि प्रत्येक देशातील कामगार—ज्यांना विवेकानंद शूद्र म्हणतात—समाजवादी आंदोलन विकसित करतील आणि नवीन समाजव्यवस्था निर्माण करतील:

---

* आज २१व्या शतकात दक्षिण अमेरिकेत जे समाजवादाचे प्रयोग होत आहेत त्यातून ह्या शंकांचे निरसनच झाले आहे. ह्या देशांमध्ये फक्त गरीबी व बेरोजगारी दूर केली जात आहे असे नाही तर लोकांना शिक्षण, आरोग्य, निवारा व अन्य सामाजिक सुविधा मोफत वा अत्यंत कमी दरात पुरवल्या जात आहेत. लोकांमधील अंगभूत क्षमता विकसित करण्याची परिस्थिती निर्माण केली जात आहे. सर्वात महत्त्वपूर्ण हे की हे सर्व अत्यंत लोकशाही मार्गाने लोकांमधून निवडल्या गेलेल्या सरकारद्वारे होत आहे.

> अशी एक वेळ येईल जेव्हा प्रत्येक देशातील शूद्र, आपल्या अंगभूत शूद्र स्वभाव आणि सवयींसह—म्हणजे वैश्य किंवा क्षत्रिय बनून नाही तर शूद्र राहूनच—समाजामध्ये पूर्ण वर्चस्व स्थापन करतील. पाश्चिमात्य देशांमध्ये ह्या नवीन शक्तींच्या उदयाची पहिली किरणे दिसायला लागली आहेत . . . समाजवाद, अराजकतावाद, उच्छेदवाद आणि ह्या प्रकारचे इतर पंथ येणाऱ्या सामाजिक क्रांतीचे बिनीचे सैनिक असतील.[65]

१९व्या शतकातच्या अखेरच्या दशकात अनेक पश्चिमात्य देशांमध्ये सशक्त समाजवादी आंदोलनाचा उदय होत होता. विवेकानंदांना आशा होती की हे आंदोलन लवकरच भारतातही आपले बी पेरेल.

> (कनिष्ठ वर्ग) आत्तापर्यंत मानवी बुद्धिमत्तेद्वारे नियंत्रित यंत्राप्रमाणे एकसारखेपणाने अनेक काळापासून काम करत आला आहे, आणि त्यांच्या श्रमाच्या उत्पादनाचा मोठा हिस्सा हुशार सुशिक्षित वर्गाने लाटला आहे. सगळया देशांमध्ये हेच झाले आहे. पण आता काळ बदलला आहे. कनिष्ठ वर्गातील लोकांना आता हळूहळू हे समजायला लागले आहे आणि आपले न्याय्य अधिकार मिळवण्यासाठी ते संघटितपणे उभे राहत आहेत. युरोप आणि अमेरिकेमधील सामान्य जनता सगळयात आधी जागृत झाली आहे व त्यांनी त्यांचा संघर्षही सुरू केला आहे. भारतातही त्याची लक्षणे दिसायला लागली आहेत. निम्न वर्गातून आजकाल जे इतके संप होत आहेत त्यातून हे स्पष्ट होते. वरच्या वर्गाचे लोक कितीही प्रयत्न केला, तरी आता खालच्या जातीतील लोकांना आणखी दडपून टाकू शकत नाही.[66]

विवेकानंद अंधश्रद्धा–अतार्किकताविरोधी चळवळीचे आणि समाजवादी परिवर्तनाच्या आंदोलनाचे अग्रदूत आहेत. मात्र ह्या उद्देशांसाठी जनआंदोलन कसे उभे करावे ह्याची त्यांची मांडणी वेगळी आहे. ते म्हणायचे की ह्या समाजवादाला धर्माची जोड द्यावी लागेल.[67] पण त्याचबरोबर, उद्याचा धर्म तर्कावर आधारित असेल आणि विज्ञानावर आधारित असेल. त्यामुळे ह्यापुढे धर्म हा स्थितीशील नसेल तर विज्ञानावर आधारित असल्याने तो गतीशील

> जोपर्यंत कोट्यवधी लोक भुकेलेले आणि अज्ञानी राहतील, तोपर्यंत मी प्रत्येकाला विश्वासघातकी समजेन, जो त्यांच्या पैशावर शिक्षित तर झाला पण त्यांच्याकडे जराही लक्ष देत नाही. ज्या लोकांनी गरिबांना चिरडून आपली संपत्ती कमावली आहे आणि आता तोऱ्यात जगत आहेत, ते जर वीस कोटी भुकेलेल्या जनतेसाठी काहीच करत नसतील तर ते तिरस्कारास प्राप्त आहेत.
>
> – Volume 5, Epistles—First Series, XXV, Alasinga, 1894

आणि परिवर्तनीय असेल.[68]

सर्व समाजवाद्यांप्रमाणे विवेकानंदांचाही सामान्य जनतेवर पूर्ण विश्वास होता. उच्च वर्ग नाही तर सामान्य लोकच समाजात परिवर्तन आणू शकतात ह्यावरही त्यांचा ठाम विश्वास होता.

> नवीन भारत निर्माण होऊ दे . . . नांगर घेऊन शेतकऱ्यांच्या झोपड्यांमधून, कोळी, भंगी, चांभार ह्यांच्या झोपड्यांमधून. वाण्याच्या दुकानातून, चणे-कुरमुरेवाल्याच्या भट्टीतून, कारखान्यातून, बाजारांतून त्यांचा उत्कर्ष होऊ दे. दऱ्याखोऱ्यातून, जंगलांमधून, डोंगरदऱ्यांतून आणि पर्वतांमधून त्याचा उदय होऊ दे.[69]

त्यांचा सामान्य माणसांवर विश्वास होता कारण त्यांच्या कष्टामुळे त्यांच्यामध्ये परिवर्तन आणण्याची हिंमत, शक्ती आणि धैर्य असते.

> ह्या सामान्य माणसांनी हजारो वर्षे जुलूम सहन केला आहे, तोंडातून ब्र ही न काढता, म्हणूनच त्यांच्याजवळ आश्चर्यकारक धैर्य आहे. त्यांनी प्रचंड दुःख सहन केलंय आणि त्यातूनच त्यांना अढळ जीवनशक्ती मिळाली आहे. हे मूठभर सत्तू खाऊन दुनिया इकडची तिकडे करू शकतात. ह्यांना अर्धी भाकर मिळाली तर मग त्यांची ऊर्जा समाविष्ट करण्यासाठी संपूर्ण जगही पुरणार नाही. त्यांच्यामध्ये अफाट चेतना आहे.[70]

शूद्र आणि दलितांच्या उन्नतीसाठी काम करणाऱ्या कुठल्याही समाजवादी कार्यकर्त्याप्रमाणेच विवेकानंदही संकुचित राष्ट्रवादी नव्हते. ते स्वतःला जागतिक नागरिक समजत होते.

> मला माझ्या आयुष्यातील इतिकर्तव्ये माहीत आहेत. माझ्यामध्ये अंध देशभक्ती नाही. मी जितका भारताचा आहे तितकाच जगाचाही आहे, ह्याबाबतीत खोटेपणा मुळीच नाही.[71]

## विवेकानंदांचे तरुणांना आवाहन

युवकांनी थोडा स्वार्थत्याग करून गरिबांच्या उन्नतीसाठी काम करावे, कारण ते त्यांचे समाजाप्रती असलेले कर्तव्य आहे, हे युवकांपर्यंत सांगण्यासाठी विवेकानंदांनी भारतभर भ्रमण केले. ते म्हणाले:

> स्वर्ग असो वा नसो, आत्मा असो वा नसो, कुठली अनश्वर शक्ती असो वा नसो, त्याची काळजी कोण करतो? आपल्यासमोर हे जग आहे आणि ते दुःखाने भरलेले आहे. बुद्धाप्रमाणे बाहेर पडून ह्या संसार-सागरात झोकून द्या, दुःख कमी

> करण्यासाठी संघर्ष करा, किंवा ह्या प्रयत्नात आपल्या जीवनाचा त्याग करा. स्वतःला विसरून जा. आस्तिक असा वा नास्तिक, अज्ञेयवादी असा वा वेदांतवादी, ख्रिश्चन असा वा मुसलमान—प्रत्येकासाठी हा पहिला धडा आहे.[72]

आपल्या इच्छा-आकांक्षांचा त्याग करून गरिबांची सेवा करण्यासाठी बाहेर पडणे हे वाटते तितके सोपे नाही. अनेक जण ह्याचा विरोध करतील आणि अनेक जण ह्याची चेष्टाही करतील. आपल्या एका शिष्याला लिहिलेल्या पत्रात विवेकानंद म्हणतात की ही परीक्षा पार करणे गरजेचे आहे. ही तीच शाळा आहे, जी आपल्याला पोलादाप्रमाणे मजबूत बनवते.

> लोकांनी माझी चेष्टा केली, माझ्यावर अविश्वास दाखवला—आणि त्याच लोकांनी माझा उपहास आणि तिरस्कार केला ज्यांना सहानुभूति दाखवल्यामुळे मला संकटांना तोंड द्यायला लागले आहे. हे वत्सा, हीच तर खरी दुःखाची शाळा आहे, महान आत्मा आणि पैगंबरांचीही शाळा आहे, जिथे सहानुभूति, धैर्य आणि अदम्य इच्छा-शक्ती विकसित होते जी जगाचा विनाश झाला तरी थरथरणार नाही.[73]

पण विरोधाला न जुमानता आपण दृढपणे चालतच राहिलो, तर एक ना एक दिवस लोक आपल्या ध्येयाचा सच्चेपणा मानतील आणि त्याचा स्वीकारही करतील.

> प्रत्येक कामाला तीन अवस्थांमधून जावे लागते-उपहास, विरोध आणि मग स्वीकृती. प्रत्येक व्यक्ती जो आपल्या काळाच्या पुढे विचार करतो, त्याला निश्चितच चुकीचे समजले जाते.[74]

पण विवेकानंदांना आत्मविश्वास होता की, भारतातील युवक पुढे येतील आणि हे आव्हान स्वीकारतील आणि हजारोंच्या संख्येने मानव जातीच्या सेवेसाठी पुढे येतील.

> मला निश्चित ठाऊक आहे की, भारतमातेला तिच्या सर्वोत्कृष्ट व सर्वश्रेष्ठ संतानांच्या बलिदानाची आवश्यकता आहे . . .
>
> काही युवकांनी ह्यात स्वतःला झोकून दिले आहे, आपल्या प्राणांचे बलिदान केले आहे. पण त्यांची संख्या थोडी आहे, आम्हाला त्यांच्यासारखे हजारो जण

> आपण मरणार, हे तर निश्चित आहे. मग सत्कार्य करता करता मरूया. . . . संपूर्ण जग एक आहे; तुम्ही त्याचा एक अतिशय क्षुल्लक अंश आहात, आणि म्हणूनच ह्या तुच्छ 'अहं'च्या उन्नतीसाठी प्रयत्न करण्याऐवजी तुमच्या कोट्यवधी बांधवांची सेवा करणे हेच तुमच्यासाठी योग्य ठरेल.
>
> – Volume 3, Lectures from Colombo to Almora, Sannyasa: Its Ideal and Practice, 19 June 1899.

पाहिजेत आणि ते येतील.[75]

विवेकानंदांचे पूर्ण आयुष्य म्हणजे भारतातील तरुण–तरुणींना देशासाठी बलिदान करण्यासाठी प्रेरित करण्याच्या अथक प्रवासाची एक महान गाथा आहे—त्यामुळे ते सामान्य जनतेबरोबर जातील, त्यांना उन्नत करतील, त्यांना संघटित करतील आणि सर्व प्रकारच्या शोषणातून मुक्त अशा नवसमाजाची निर्मिती करतील. ह्यात ते यशस्वी होतील ह्यावर त्यांचा पूर्ण विश्वास होता.

> माझ्यावर विश्वास ठेवा, आपल्या बलिदानामुळे, विशाल आणि अप्रतिम कार्यकर्ते तयार होतील जे जगभरामध्ये आमूलाग्र बदल घडवून आणतील.[76]

# संदर्भ

जर दुसरा संदर्भ दिलेला नसेल तर सर्व संदर्भ ह्यातून घेतले आहेत: *Complete Works of Swami Vivekananda*, www.ramakrishnavivekananda.info.


1 दत्तप्रसाद दाभोळकर, *शोध स्वामी विवेकानंदांचा*, मनोविकास प्रकाशन, मुंबई व पुणे, २०१०.

2 See Endnote 42.

3 Volume 5 / Epistles—First Series / LXXVIII / Mary Hale, 9 July 1897.

4 Volume 5 / Epistles—First Series / IV / Alasinga, 20 August 1893.

5 Ibid.

6 Volume 3 / Reports in American Newspapers / Miracles, 17 February 1894.

7 Volume 1 / Lectures and Discourses / Soul, God and Religion.

8 Volume 5 / Epistles—First Series / XXIII / Kidi, 30 November 1894.

9 Volume 8 / Notes of Class Talks and Lectures / Man the Maker of His Destiny.

10 Ibid.

11 Ibid.

12 Volume 3 / Lectures from Colombo to Almora / The Work Before Us.

13 Volume 8 / Epistles—Fourth Series / IX / Haridas Viharidas Desai, 22 August 1892.

14 Volume 5 / Epistles—First Series / III / Alasinga, 10 July 1893.

15 Volume 6 / Epistles—Second Series / LXXI / Rakhal, 1895.

16 Volume 6 / Lectures and Discourses / The Methods and Purpose of Religion.

17 Swami Nikhilananda, “Early Years” in *Vivekananda A Biography*.

18 Volume 7 / Inspired Talks / Recorded by Miss S.E. Waldo, 24 June 1895.

19 Volume 4 / Writings: Prose / To My Brave Boys, 19 November 1894.

20 Ibid.

21 Volume 6 / Epistles—Second Series / XLI / Ramakrishnananda, 19 March 1894.

22 Volume 6 / Epistles—Second Series / IX / Sir, 17 August 1889.

23 Volume 5 / Epistles—First Series / V / Alasinga, 2 November 1893.

24 Volume 5 / Epistles—First Series / VI / Haripada Mitra, 28 December 1893.

25 Volume 5 / Epistles—First Series / III / Alasinga, etc., 10 July 1893.

26 Volume 4 / Writings: Prose / Aryans and Tamilians.

27 Volume 8 / Epistles—Fourth Series / XCVI / Sister Nivedita, 4 July 1897.

28 Volume 3 / Lectures from Colombo to Almora / The Mission of the Vedanta.

29 Swami Nikhilananda, “Vedanta In America” in *Vivekananda A Biography*.

30 Volume 5 / Epistles—First Series / VII / Madras Devotees, 24 January 1894.

31 Volume 5 / Epistles—First Series / VIII / Alasinga, 9 April 1894.

32 Volume 6 / Epistles—Second Series / LXXI / Swami Brahmananda, 1895.

33 Volume 3 / Lectures from Colombo to Almora / The Mission of the Vedanta.

34 “Vivekananda the Revolutionary”, http://americanvedantist.org.

35 Volume 1 / Lectures and Discourses / Soul, God and Religion.

36 Volume 4 / Addresses on Bhakti-Yoga / The Ishta.

37 Volume 2 / Jnana-Yoga / The Necessity of Religion.

38 Volume 4 / Lectures and Discourses / The Great Teachers of the World.

39 Volume 6 / Epistles—Second Series / CXLII / Sarfaraz Husain, 10 June 1898.

40 Volume 4 / Writings: Prose / To My Brave Boys, 19 November 1894.

41 Volume 6 / Epistles—Second Series / CXLII / Sarfaraz Husain, 10 June 1898.

42 Volume 6 / Epistles—Second Series / XLI / Shashi, 19 March 1894.

43 Volume 5 / Epistles—First Series / II / Pandit Shankarlal, 20 September 1892.

44 Volume 8 / Epistles—Fourth Series / XXXIV / Haridas Viharidas Desai, November 1894.

45 Volume 1 / Lectures and Discourses / Soul, God and Religion.

46 Volume 2 / Practical Vedanta and Other Lectures / The Way to the Realisation of a Universal Religion.

47 Ibid.

48 Volume 4 / Writings: Prose / What We Believe In, 3 March 1894.

49 Volume 6 / Epistles—Second Series / CXXXVI / Swami Akhandananda, 10 October 1897.

50 Volume 2 / Practical Vedanta and Other Lectures / The Way to the Realisation of a Universal Religion.

51 Volume 2 / Jnana-Yoga / The Necessity of Religion; Volume 3 / Lectures and Discourses / Unity, the Goal of Religion.

52 Volume 6 / Epistles—Second Series / CXLII / Sarfaraz Husain, 10 June 1898.

53 Volume 7 / Epistles—Third Series / XXXII / Alambazar Math, 27 April 1896.

54 Volume 6 / Epistles—Second Series / LXXI / Swami Brahmananda, 1895.

55 Volume 7 / Epistles—Third Series / XXXII / Alambazar Math, 27 April 1896.

56 Volume 2 / Jnana-Yoga / The Necessity of Religion.

57 Volume 4 / Writings: Prose / To My Brave Boys, 19 November 1894.

58 Volume 8 / Epistles—Fourth Series / XX / Haridas Viharidas Desai, 20 June 1894.

59 Volume 5 / Epistles—First Series / XXV / Alasinga, 1894.

60 Volume 6 / Epistles—Second Series / CXII / Mary Hale, 1 November 1896.

61 Volume 3 / Lectures from Colombo to Almora / Reply to the Address of Welcome at Paramakudi, 1 February 1897.

62 Volume 6 / Epistles—Second Series / CXII / Mary Hale, 1 November 1896.

63 Volume 4 / Translations: Prose / Our Present Social Problems, 23 December 1898.

64 Volume 6 / Epistles—Second Series / CXII / Mary Hale, 1 November 1896.

65 Volume 4 / Translations: Prose / Modern India (*Udbodhana*, March 1899).

66 Volume 7 / Conversations and Dialogues / From the Diary of a Disciple (Sharat Chandra Chakravarty): VII (Belur Math, 1898).

67 Volume 5 / Interviews / Indian Missionary's Mission to England.

68 Volume 1 / Lectures and Discourses / Reason and Religion.

69 Volume 7 / Translation of Writings / Memoirs of European Travel: I.

70 Ibid.

71 Volume 5 / Epistles—First Series / LII / Alasinga, 9 September 1895.

72 Volume 2 / Practical Vedanta and Other Lectures / Practical Vedanta: Part IV.

73 Volume 5 / Epistles—First Series / IV / Letter to Alasinga, 20 August 1893.

74 Volume 5 / Epistles—First Series / XLVII / Maharaja of Khetri, 9 July 1895.

75 Volume 6 / Epistles—Second Series / LI / Dr. Nanjunda Rao, 30 November 1894.

76 Swami Nikhilananda, “In Northern India” in *Vivekananda A Biography*.

# आमच्याबद्दल: लोकायत

भारतीय राज्यघटनेची मार्गदर्शक तत्त्वे शासनाला अशी सामाजिक व्यवस्था स्थापण्याचे निर्देश देतात, ज्यामध्ये: सर्वांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय मिळेल [कलम ३८(१)]; सर्वांना पुरेशी उपजीविका मिळवण्याचे अधिकार असतील [कलम ३९(क)]; शासन उत्पन्नातील विषमता नष्ट करेल आणि संपत्तीचे केंद्रीकरण होऊ न देण्याचा प्रयत्न करेल [कलम ३८(२), ३९(ग)]; लोकांचे जीवनमान उंचावणे, लोकांच्या आरोग्याचा स्तर सुधारणे, शिक्षण देणे हे शासन आपले प्राथमिक कर्तव्य मानेल [कलम ४१ व ४७].

दुर्दैवाने, भारतातील सर्व मुख्य पक्षांनी भारतीय राज्यघटनेच्या ह्या कल्पनांना हरताळ फासत जनतेशी नाळ तोडलेली आहे. १९९१मध्ये अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण चालू केल्यानंतर ते फक्त विदेशी-देशी बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या नफेखोरीसाठीच देश चालवत आहेत.

पण आपण निराशा आणि तटस्थपणा सोडला पाहिजे. सुंदर भविष्याचे स्वप्न पाहिले पाहिजे, विश्वास ठेवला पाहिजे की जग बदलता येऊ शकते. ह्यासाठीच आम्ही सामान्य लोक मिळून गेल्या अनेक वर्षांपासून **लोकायत** ही संघटना चालवतो व विविध कार्यक्रम करतो.

- वाढती महागाई व बेरोजगारी, अत्यावश्यक सेवांचे खाजगीकरण व व्यापारीकरण, शहरामधील सार्वजनिक वाहतूक सेवेची खराब अवस्था, अणुऊर्जेची घातकता, विकासाच्या नावावर लाखो लोकांची जीविका उद्ध्वस्त करणारे उद्योग अशा प्रश्नांवर जनजागृती करतो आणि लोकांना संघटित करण्याचा प्रयत्न करतो. ह्या अभियानांमध्ये आम्ही पोस्टर प्रदर्शन, चित्रपट–माहितीपट, सडक नाटक, गीत अशा विविध कलाप्रकारांचा वापर करतो आणि सेमिनार–व्याख्याने–धरणे–मोर्चे आयोजित करतो.
- आम्ही धार्मिक दंगली, जातीय शोषण, अमेरिकेचे तिसऱ्या जगातील देशांवर हल्ले, जागतिक तापमान वाढ अशा विषयांवर सेमिनार, विरोध प्रदर्शने आयोजित करतो.
- 'अभिव्यक्ती' ही लोकायतची महिला आघाडी आहे जी महिलांच्या प्रश्नांवर सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करते.
- लोकायतचा एक सक्रिय सांस्कृतिक मंचसुद्धा आहे, जो विविध कला-प्रकारांचा वापर करून लोकांची सामाजिक–सांस्कृतिक चेतना वाढवण्याचा प्रयत्न करत असतो.
- आम्ही आवश्यक विषयांवर पुस्तिका आणि पत्रकेही प्रकाशित करत असतो.

मित्रहो, जर तुम्हाला आमच्याबद्दल अधिक जाणून घ्यायचे असेल आणि आमच्या उपक्रमांमध्ये सहभागी व्हायचे असेल, तर आम्हाला खालील पत्त्यांवर संपर्क करू शकता.


**संपर्क पत्ता:** लोकायत, सिंडिकेट बँकेसमोर, लॉ कॉलेज रोड, नळस्टॉप जवळ, पुणे – ४.

*(ह्या पत्त्यावर दर रविवारी संध्याकाळी ५ ते ७:३० ह्या वेळेत मीटिंग होते.)*

नीरज जैन – ९४२२२२०३११, ऋषिकेश येवलेकर – ९४२३५०७८६४

www.lokayat.org.in lokayat.india@gmail.com

lokayat.india @lokayat lokayatpune

# कोण होते स्वामी विवेकानंद?

## विवेकानंद म्हणतात . . .

- भाग्य नावाची अशी कोणतीही गोष्ट नाही.
- धूर्त पुरोहित वेद-पुराणे आणि हिंदू धर्माच्या नावावर हास्यास्पद आणि वेडसर गोष्टी शिकवत आहेत. कलियुगातल्या ह्या ब्राह्मण रूपी राक्षसांपासून ईश्वर लोकांचे रक्षण करो.
- धार्मिक पुस्तकांवर डोळे मिटून विश्वास ठेवू नका. . . . सत्याचा शोध तर्काच्या आधारावर स्वतः करा.
- जातीव्यवस्था भारताच्या पर्यावरणामध्ये आपली दुर्गंधी पसरवत आहे . . . आम्ही खालच्या जातीच्या लोकांना शिवत नाही, त्यांच्यापासून पळ काढतो. आम्ही माणसे आहोत का?
- भारताचा अभ्युदय करायचा असेल, तर हिंदू धर्म व इस्लाम ह्यांच्यात केवळ सहकार्यच नव्हे तर संगम हवा.
- सर्व धर्मांचा एकच आदर्श आहे—स्वातंत्र्य प्राप्ती आणि दुःखापासून मुक्ती!
- ह्या देशातील ख्रिश्चन आणि मुसलमान धर्मांतरे दबावामुळे नव्हे तर उच्चवर्णीयांनी केलेल्या अत्याचारांमुळे झाली आहेत.
- धर्माने सामाजिक बाबींमध्ये लुडबुड करता कामा नये. प्रत्येकाला त्याच्या इच्छेनुसार माहिती घेण्याचे, निवडीचे आणि अनुसरण करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे. कुणाला मांसाहार ठीक वाटत असेल तर दुसऱ्या कुणाला फलाहार. दुसऱ्यांनी आपलेच अनुसरण करावे ह्यासाठी त्यांच्यावर दबाव टाकण्याचा कोणालाही अधिकार नाही.
- स्त्रिया मुक्त झाल्याशिवाय देशाची प्रगती शक्य नाही.
- समाजवाद ही परिपूर्ण रचना आहे म्हणून मी समाजवादी आहे असे नाही . . . आजवर इतर सर्व व्यवस्था अनुभवून झाल्या असून त्यामध्येही कमतरता होत्या. आता हा प्रयोग होऊ द्या.
- जोपर्यंत कोट्यवधी लोक भुकेलेले आणि अज्ञानी राहतील, तोपर्यंत मी प्रत्येकाला विश्वासघातकी समजेन, जो त्यांच्या पैशावर शिक्षित तर झाला पण त्यांच्याकडे जराही लक्ष देत नाही.

सोशलिस्ट पार्टी (इंडिया)

लोकायत

जनता साप्ताहिक, मुंबई